RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर वर्ष ३४ वे अंक १४७ वा गुरूवार, दिनांक २८ ऑगस्ट २०२५ (सांज. दैनिक) पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26 पृष्ठे – ६ मो:९४२२४७२५०२ किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील
संपर्क
जडे ऑफसेट प्रिंटर्स
मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८


# लातूर जिल्ह्यात सर्वदूर पाऊस, रस्त्यावर पाणी; काही गावे पावसाने प्रभावित

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात २८ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी ६२.८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये जळकोट तालुक्यात सर्वाधिक ७७.७ मिलीमीटर, तर उदगीर तालुक्यात सर्वात कमी ५० मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे– लातूर– ६०, औसा– ५७.३, अहमदपूर– ६२.९, निलंगा– ५०, उदगीर– ८६.९, चाकूर– ५१.७, रेणापूर– ६४.९, देवणी– ५९.२, शिरूर अनंतपाळ– ७२.७ आणि जळकोट– ७७.९ मिलीमीटर. पावसाची नोंद झाली आहे. तसेच २९ महसूल मंडळात ६५ मिलीमीटरपेक्षा अधिक पाऊस झाला आहे.

लातूर जिल्ह्यात रात्री झालेल्या पावसामुळे खालील मार्गावर पुलावरून पाणी वाहत आहे. त्यामुळे या मार्गावरील एस टी बस वाहतूक बंद करण्यात आली आहे.

**प्रभावित रस्त्यांची यादी**

१. माणकेश्वर – उदगीर मार्गावरील इंद्राळ येथील पुलावरून पाणी वाहत आहे.

२. बोटकुळ निलंगा मार्गावर पुलावरून पाणी वाहत आहे.

३. अतनूर येथील पुलावरून पाणी वाहत आहे. उदगीर–अतनूर–बाराळी रस्ता बंद आहे.

४. उटी व अलमला रस्त्यावर पुलावरून पाणी जात असल्यामुळे त्या मार्गावरील वाहतूक बंद आहे.

५. बैठना येथील पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे अजनी ते उदगीर वाहतूक बंद आहे.

६. औसा ते हसलगन रोडवर जवळगावाडी येथे पुलावरून पाणी जात असल्यामुळे सदर मार्गावर वाहतूक बंद आहे.

७. एकंबा येथील पुलावर पाणी आल्यामुळे सदर मार्गावरील वाहतूक बंद आहे.

८. धडकनाळ बोरगाव च्या पुलावर पाणी आल्यामुळे उदगीर ते देगलूर मार्गावरील वाहतूक बंद झाली आहे.

९. मौ शेळगाव तालुका चाकुर मध्ये तिरु नदीवरील पुलावरून पाणी वाहत आहे.

१०. सिंगनाळ ता. निलंगा येथील ओढ्याचे पाणी पुलावरून वाहत असल्याने सिंगनाळ येथील वाहतूक बंद आहे

११. ढोरसांगवी गावचा संपर्क तुटला नदी वरून पाणी जात आहे

१२. उस्तुरी ते टाकळी ता. निलंगा येथील ओढ्याचे पाणी पुलावरून वाहत असल्याने उस्तुरी येथील वाहतूक बंद आहे

१३. हालसी (तु.) वरून तुगाव जाणाऱ्या रस्त्यावर नदीचे पाणी आल्यामुळे रस्ता बंद आहे.

१४. वायगाव पाटी ते गादेवाडी तालुका अहमदपूर रस्त्यावरील पुलावरून पाणी वाहत आहे

१५. हासोरी खुर्द ते हासोरी बु ता. निलंगा जाणाऱ्या रस्त्यावर पुलावरून पाणी वाहत आहे रस्ता बंद आहे

१६. मौजे शेणकुड येथील पूल पाण्याखाली गेल्यामुळे बरेच दिवसापासून हा मार्ग बंद झाला आहे पण ढालेगाव आणि सांगवी सु असे दोन पर्यायी मार्ग चालू आहेत.





१७. काल रात्रीपासून सुरू असलेल्या पावसामुळे नळेगाव सज्जातील हटकरवाडी एक या गावातील नदीला आलेल्या पुरामुळे हटकरवाडी ते नळेगाव हा रस्ता बंद झालेला असून पुलाच्या वरून दोन ते तीन फूट पाणी वाहत आहे.

१८. नळेगाव ते लिंबाळवाडी रस्त्यावरील पुलावरून पाणी जात असून सदर रस्ता सुद्धा बंद झालेला आहे.

१९. शिरूर अनंतपाळ ते हणमंतवाडी जाणारा पुल पाण्याखाली गेला आहे

२०. मौजे दैठणा तालुका शिरूर अनंतपाळ येथील श्री व्यंकट शंकर सामानगावे यांच्या राहत्या घराची भिंत संततधार पावसाने दिनांक २८.०८.२०२५ रोजी पडली आहे.

२१. अहमदपूर तालुका हासरणी ते उन्नी जांब रस्त्याच्या पुलावरून पाणी जात असल्यामुळे सदरील रस्ता बंद झाला आहे. पर्यायी रस्ता हाडोळती मार्गे आहे

२२. मौजे शिरूर अनंतपाळ ते नागेवाडी जाणारा घरणी नदीवरील पुलावरून पाणी वाहत आहे.

२३. नळेगाव ते लिंबाळवाडी रस्त्यावरील पुलावरून पाणी जात असून सदर रस्ता सुद्धा बंद झालेला आहे..

२४. मौजे धसवाडी येथील शेतकरी लक्ष्मण नामदेव गोजेगावकर याची गाय पाऊसामुळे नाल्यात आलेल्या पुरामुळे मयत झाली आहे

२५. आनंदवाडी सुनेगाव पुलावरून पाणी गेल्यामुळे सदरील रस्ता बंद झाला आहे. पर्यायी रस्ता उपलब्ध आहे.

२६. औराद – वांजरखेडा नदीपात्रातील पुलावरून पाणी वाहत आहे त्यामुळे रस्ता बंद झाला आहे

२७. सोनखेड ता. निलंगा किटीअवेर पुलावरून पाणी

२८. औराद शहाजानी ता. निलंगा ते भालकी जाणाऱ्या रस्त्यावर भातंबरा गावात जवळ नदीचे पाणी रस्त्यावर वाहत असलेल्यामुळे रस्ता बंद झाला आहे

२९. चिलवंतवाडी ते कासार बालकुंद रस्त्यावर पाणी असल्यामुळे गाडी बंद आहे

३०. शिरूर अनंतपाळ जवळ घरणी नदी ला पाणी आल्याने पुलावरून पाणी वाहत असल्याने सदर मार्गावरील

कानेगाव व टाकळी बसेस नळेगाव येरोळमोड मोड मार्गे मार्गस्थ करण्याचे सुचना आहेत.

३१. वरवंटी ते शिंदगी च्या मधील पुलावरून पाणी जात आहे

३२. लातूर – निजामाबाद मार्गावर नरसी येथे नदीपुलावरून पाणी वाहत असल्यामुळे वाहतूक बंद आहे. ३३. ३३. उदगीर निझामाबाद मार्ग मुखेड नियत नरसी व बिलोली च्या मध्ये तळणी येथे रस्त्यावर पाणी आल्याने सदरची वाहतूक बंद आहे. त्यामुळे सदरचे नियत नरसी येथून परत बोलावले आहे

३४. शिरूर अनंतपाळ ते येरोळ–उदगीर जाणाऱ्या रस्त्याच्या पुलावरून पाणी वाहत असलेल्यामुळे रस्ता बंद झाला आहे

३५. शिरूर अनंतपाळ ते हणमंतवाडी जाणारा पुल पाण्याखाली गेला आहे रस्ता बंद झाला आहे

३६. शिरशी तालुका लातूर सरहद्द ते धानोरा ते ईजिमा–११५ रस्त्यावरील साखळी क्रमांक ०/७०० येथील नळकांडी पुलाजवळ भराव वाहून गेल्यामुळे रस्ता वाहतुकीस धोकादायक होऊन रस्ता बंद आहे.

३७. औसा तालुका मौजे पोमादेवी जवळगा ते संक्राळ रस्त्याच्या पुलावर पुराचे पाणी आलेले आहे, वाहतुकीसाठी रस्ता बंद केलेला आहे.

३८. जळकोट तालुक्यातील ढोरसंगवी आणि धनगरवाडी या गावाचा लाळी बु पुलावरून पाणी जात असल्याने सम्पर्क तुटला आहे

३९. नावंदी ते उदगीर ग्रामरस्तावरील ओढ्याला पूर आल्याने सध्या बंद करण्यात आला आहे.

**नागरिकांनी घ्यावयाची काळजी**

१. नागरिकांनी दुभती तसेच इतर जनावरे झाडाखाली, पाण्याच्या स्त्रोताजवळ, विद्युत खांबाजवळ बांधू नयेत. त्यांना सुरक्षित ठिकाणी बांधावे. आपल्या जनावरांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करुन स्वतः सुरक्षित ठिकाणचा आसरा घ्यावा.

२. जलसाठ्याजवळ, नदीजवळ जावू नये. आपल्या मुलांना जलसाठ्यावर, नदीवर पोहण्यासाठी पाठवू नये. शाळा, महाविद्यालयातील शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना याबाबत सूचित करावे.

३. पुलावरुन, नाल्यावरुन पाणी वाहत असतांना कोणीही स्वतः किंवा वाहनासह पूल, नाला ओलांडण्याचा प्रयत्न करु नये. पूर प्रवण क्षेत्रात कोणीही जाऊ नये.

४. पाऊस सुरु असतांना विजेच्या तारा, जुन्या इमारती कोसळण्याची शक्यता असते,तरी त्यापासून दूर राहण्याची खबरदारी घ्यावी.

## रेणा नदी काठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर मध्यम प्रकल्प ८७% भरला असून सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरण पूर्ण भरू शकते. त्यामुळे रेणा नदीत पाण्याचा विसर्ग होऊ शकतो. नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन लातूर जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## किनगाव : बंद पडलेल्या बसला धक्का देण्याची प्रवाशांवर वेळ

**लातूर/प्रतिनिधी :** या चार पाच वर्षांत एसटी बसने प्रवास करणार्या नागरिकांची संख्या वाढत आहे.मात्र अहमदपूर आणि अंबाजोगाई बस डेपोच्या अनेक एसटी बस गाड्या या खिळखिळ्या झाल्या आहेत. सोमवारी सकाळी ११ च्या सुमारास किनगाव रस्त्यावर एक बस बंद पडली. नागरिकांना ही बस धक्का देऊन चालू करावी लागल्याची वेळ आली. त्यामुळे प्रवासी नाराजी व्यक्त करीत आहेत.

महामंडळाच्या अनेक एसटी बस या जुन्या झाल्या आहेत त्यामुळे अनेक गाड्या मलमपट्टी करून सुरू करण्यात आल्याने गाड्या बंद पडणे, गाड्यातून मोठ्या प्रमाणावर काळा धूर येत येणे, गाड्या खिळखिळ्या झालेल्या अवस्थेत, अनेक गाड्यांच्या सीट व खिडक्याही अनेक ठिकाणी तुटल्याने आरामदायी गाड्या आता डोकेदुखी बनत आहेत.अनेक बसची दुरवस्था झाली आहे.

सध्याची बससेवा अहमदपूर ते अंबाजोगाई जाण्यासाठी दर अर्धा तासाला गाडी आहे तसेच किनगाव मार्गे छत्रपती संभाजीनगर, जालना, पुणे, लातूर, पंढरपूर, चाळीसगाव, शिंगणापूर आशा अनेक लांबपल्याच्या बस येथून जातात. किनगाव गंगाखेड,परळी बस सेवा सुद्धा आहे. एसटी बस अनेक गाड्या खिळखिळ्या झाल्या आहेत. मोजक्याच गाड्या चांगल्या अवस्थेत आहेत तर अनेक जुन्या गाड्या असल्याने काही गाड्यांचे सीट व त्यांचे हँडल तुटलेले असून काचा निसटलेल्या आहेत.अहमदपूर आणि अंबेजोगाई डेपोने बस गाड्या बदलण्याची गरज झाली आहे. खिळखिळ्या बसमधून प्रवास केल्यावर प्रवाशी नाराज होतात तर धूर मारणार्या बस मुळे गावातील व्यापार्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात कॉमर्स असोसिएशनची स्थापना

### संस्था सदस्य कुणाल कोरे यांच्या उपस्थितीत पदग्रहण



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी कॉमर्स असोसिएशन (वाणिज्य मंडळ) स्थापन करण्यात आले. संस्थेचे सदस्य कुणाल कोरे यांच्या उपस्थितीत मंगळवार, दि. २६ ऑगस्ट रोजी पदग्रहण सोहळा पार पडला.

या अनुषंगाने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य मंडळ प्रभारी प्रा. निकिता अग्रवाल आदींची उपस्थिती होती. दयानंद वाणिज्य महाविद्यालयात दरवर्षी वाणिज्य मंडळ स्थापना करून त्यात विद्यार्थ्यांना विविध पदे दिली जातात. या मंडळ अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन देखील केले होते. यावेळी बोलताना कुणाल कोरे म्हणाले, विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकास, कौशल्ये वृंद्धिंगत करणे याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. निकिता अग्रवाल यांनी, सूत्रसंचालन डॉ. रूपा गिल्डा यांनी तर शेवटी आभार प्रा. क्षितिज कांबळे यांनी मानले. कार्यक्रमास डॉ. विशाल वर्मा, डॉ. विठ्ठल जाधव, डॉ. प्रिया वर्मा, प्रा. पूजा भोसले, प्रा. सुहाना शेख आदीसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**नांदेड ते मुंबई वंदे भारत रेल्वेला सीएम यांच्या हस्ते शुभारंभ.**



## चिमटा दयाचा

**मानवावर करोनाचे संकट आले होते ! आता जनावरांसाठी साथरोगाचे संकट आले आहे !! हा बदलत्या निसर्गाचा परिणाम आहे !!**

## बेकायदेशीररित्या गावठी पिस्टल व जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या आरोपीस १,९३,५००/- रुपयाच्या मुद्देमालासह अटक

**लातूर/प्रतिनिधी :** बेकायदेशीररित्या गावठी पिस्टल व जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या आरोपीस १,९३,५००/- रुपयाच्या मुद्देमालासह अटक याबाबत समजलेली माहिती अशी की, आगामी सण उत्सव काळात शांतता अबाधित राखणे करिता पोलीस स्टेशन हद्दीत दहशत निर्माण करणारे, रेकॉर्डवरील गुन्हेगार, शरीराविरुद्ध गुन्हे करणारे गुन्हेगार, अवैधरित्या शस्त्र बाळगणारे गुन्हेगार यांची माहिती काढून कार्यवाही करणेबाबत पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांचे सूचनेप्रमाणे जिल्हाभरात कार्यवाही सुरू असताना. पोलीस स्टेशन विवेकानंद चौक येथील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे एक पोलीस पथक पोस्टे हद्दीत गस्त घालत असताना गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहिती प्रमाणे नवीन रेणापूर नाका ते डी मार्ट येणारे रोडवर एक इसम याचे जवळ गावठी पिस्टल असल्याचे माहितीप्रमाणे सदर रोडवर सापळा रचून स्कुटीसह थांबलेले इसमाकडे असणारी स्कुटी क्रमांक MH 24 -N 3240 डिग्गीची पाहणी केली असता डिग्गी मध्ये गावठी पिस्टल आढळून आले नमूद इसमाला ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव १) अलोक विश्वनाथ चौधरी वय ३६ वर्ष रा. आंबा हनुमान जवळ अंबाजोगाई रोड लातूर असे सांगितले. सदरील इसमाला ताब्यात घेतले असता त्याच्याकडे एक गावठी पिस्टल व १७ जिवंत काडतुसे मिळून आले सदर पिस्टल व काडतुसांचे परवाना बाबत विचारपूस केली असता परवाना नसल्याचे सांगितले त्यास पोलीस पथकाने ताब्यात घेऊन त्याच्याकडून बेकायदेशीररित्या पिस्टल बाळगले संदर्भाने एकूण १,९३,५००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करून पोलीस स्टेशन विवेकानंद चौक येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे पुढील तपास पोउपनि सचिन रेडेकर हे करीत आहेत.




सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर श्री समीरसिंह साळवे यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे विवेकानंद चौक चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे नेतृत्वात पोस्टे चे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथकातील पोउपनि सचिन रेडेकर पोलीस अंमलदार खुर्रम काझी,यशपाल कांबळे, रणवीर देशमुख,गणेश यादव,धैर्यशील मुळे, सचिन राठोड,आनंद हल्लाळे यांनी केली आहे.

## सोयाबीन पिकावरील कीड, रोगांचे वेळीच नियंत्रण कसं करायचं; कृषी विभागाची माहिती

**रेणापूर/प्रतिनिधी :** मागील काही दिवसांत झालेल्या संततधार पावसामुळे शेतात पाणी साचलेल्या ठिकाणी सोयाबीन पिकात मानकूज आणि मूळकूज या रोगांचा तर काही ठिकाणी सोयाबीनच्या खालच्या भागात आर्द्रता वाढून शेंगावरील करपा, पानावरील बुरशीजन्य ठिपके या रोगाच्या प्रादुर्भावाबरोबरच खोडमाशी, स्पोडोप्टेरा आणि शेंगा पोखरणार्या अळीचा प्रादुर्भाव पुढील काळात वाढण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकर्यांनी वेळीच उपाययोजना करावी असा सल्ला कृषी विभागाकडून दिला जात आहे. सोयाबीन पीक हे ५० ते ५५ दिवसांचे असून सध्या हे पीक दाणे भरण्याच्या अवस्थेत आहे. अशा परिस्थितीत पाऊस पडल्याने अनेक शेतकर्यांच्या शेतात पाणी साचलेले आहे. सर्वप्रथम शेतात साचलेल्या पाण्याचा निचरा करून देण्याची व्यवस्था शेतकर्यांनी करावी. तसेच खाली दिलेल्या कीटकनाशकापैकी एक कीटकनाशक आणि बुरशीनाशकापैकी एका बुरशीनाशकाची निवड करून तात्काळ त्याची फवारणी केल्यास किडींचे आणि बुरशीजन्य रोगांचे नियंत्रण होऊन चांगल्याप्रकारे शेंगात दाना भरण्यास मदत होईल.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

# अमेरिकेचे टॅरिफ एक आर्थिक संकट

अमेरिकेची दादागिरी दिवसेनदिवस वाढत आहे. याबाबत आता भारतीयांनी विचार केला पाहिजे. कारण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाकडून तेल खरेदी करत असल्यामुळे भारतावर अतिरिक्त २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादला आहे. हे अतिरिक्त टॅरिफ २७ ऑगस्ट पासून लागू झाले आहे. ट्रम्प यांनी यापूर्वी भारतावर २५ टक्के कर लादला होता जो ७ ऑगस्टपासून लागू झाला होता. यामुळे भारतावरील एकूण कर ५० टक्के झाला आहे जो जगात सर्वाधिक आहे. ट्रम्प यांच्या निर्णयामुळे भारताला केवळ अमेरिकेसोबत असलेल्या संबंधांचा पुनर्विचार करावा लागलेला नाही, तर अमेरिकेकडून सवलतींची अपेक्षा न करता किंवा त्यांच्या पुनर्विचाराची वाट न पाहता पुढील पावले उचलावी लागणार आहेत. यासोबतच मोदी सरकारला या धक्क्याचा सामना करण्यासाठी देशांतर्गत सक्षमतेवर लक्ष केंद्रीत करणे भाग पडले आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफचा सामना करण्यासाठी भारत आता तीन टप्प्यांतील रणनीतीवर विचार करत आहे. असे दिसून येते, यामध्ये धोरणात्मक पर्याय, जीएसटी सुधारणांसह देशांतर्गत वापर वाढवणे आणि स्वावलंबन आणि व्यवसाय सुलभता यांचा समावेश दिसून येणार आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे भारताला अमेरिकेवर निर्यातीसाठी असलेली अति-निर्भरता कमी करण्याची संधी मिळाली आहे तर ब्राझिलचे राजकीय शास्त्रज्ञ माटियास स्पेक्टर यांनी ट्रम्प यांच्या राजकीय दबावाच्या साधनांविरुद्ध भारताने उचललेल्या पावलांचे वर्णन धोरणात्मक पर्याय असे केले आहे. स्पेक्टर यांच्या मते, धोरणात्मक पर्याय म्हणजे संपूर्ण आत्मनिर्भरता नव्हे, तर कृतीस्वातंत्र्य जपणे आणि भारत सध्या याच गोष्टीला प्राधान्य देताना दिसतो आहे असे म्हटले आहे. ट्रम्प टॅरिफला भारताचा प्रतिसाद स्पष्टपणे दिजून येणार आहे, भारत व्यापार भागीदारांमध्ये विविधता आणणे आणि अमेरिकेवरील अवलंबित्व कमी करणे याबाबत पाऊले उचलली पाहिजेत. निवडक क्षेत्रांमध्ये चीनसोबत व्यापार मार्ग पुन्हा उघडले जात आहेत आणि रशियाशी व्यापार संबंध वाढविण्याचा सक्रियपणे विचार केला जात आहे. भारतीय कंपन्या आफ्रिका, पश्चिम आशिया आणि आग्नेय आशियातील बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी जलदगतीने प्रमाणपत्रे मिळवत आहेत.त्याच प्रमाणे भारतात जीएसटी सुधारणा करून देशांतर्गत उपभोग बाजारपेठ वाढविण्याचा विचार दिसून येत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची ताकद निर्यातीवर अवलंबून असलेल्या अनेक देशांप्रमाणे बाह्य बाजारांवर अवलंबून नसून देशांतर्गत खपावर आधारित आहे. खाजगी खर्चाचा भारताच्या एकूण जीडीपीमध्ये सुमारे ६१.४% हिस्सा आहे, तर अमेरिकेला होणारी ८७.४ अब्ज डॉलर्सची निर्यात ही भारताच्या एकूण उत्पादनाच्या केवळ २% इतकीच आहे. स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान मोदींनी जाहीर केलेली जीएसटी सुधारणा ही त्यातील एक महत्त्वाची बाब आहे. करांच्या स्लॅबची संख्या कमी करण्याचा दीर्घकाळ प्रलंबित प्रस्ताव पुढे ढकलण्यात आला आहे. राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या एका समितीने जीएसटीला दोन स्तरांमध्ये सुलभता आणण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे असे समजते. उद्योग क्षेत्राकडून बऱ्याच काळापासून मागणी होत असलेल्या या सुधारणा आता भारत हा एक आकर्षक आणि सुधारणावादी विचारसरणीचा देश असल्याचे संकेत देण्यासाठी केल्या जात आहेत. अमेरिकेत काहीही चालले असले तरी, भारत सुधारणा करत आहे. भारत हा एक आकर्षक गुंतवणूक केंद्र आहे हे दाखवण्यासाठी सरकारकडून प्रयत्न होत आहेत, असे नोमुरा होल्डिंग्जच्या सोनल वर्मा म्हणाल्याच आहेत. ब्लूमबर्गच्या एका अहवालानुसार, पंतप्रधान कार्यालय, वाणिज्य मंत्रालय आणि अर्थ मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी यांच्यात नुकतीच एक बैठक झाली आहे. या बैठकीत संभाव्य उपाययोजनांवर चर्चा झाली, ज्यामध्ये कमी व्याजदराचे कर्ज उपलब्ध करून देणे आणि नवीन बाजारपेठांमध्ये प्रवेशासाठी उद्योग क्षेत्राला मदत करणे यांचा समावेश आहे. वास्तविक धोरणात्मक बदलांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी मोदींनी दोन उच्चस्तरीय पॅनेल स्थापन केले आहेत. गेल्या आठवड्यात पहिल्यांदाच बैठक झालेल्या या समितीपैकी एकाचे नेतृत्व कॅबिनेट सचिव टीव्ही सोमनाथन करत आहेत आणि ते राज्यस्तरीय नियंत्रणमुक्तीवर लक्ष केंद्रित करतील, असे या प्रकरणाशी परिचित असलेल्या एका अधिकाऱ्याने सांगितले आहे. दुसऱ्या पॅनेलचे नेतृत्व नीति आयोगाचे सदस्य राजीव गौबा करत आहेत, जे मोदींनी अधोरेखित केलेल्या पुढील पिढीतील सुधारणांसाठी शिफारसी तयार करतील, असे त्यांनी सांगितले. टैरिफ बाबत अमेरिकेने जाणून-बुजून घेतलेला निर्णय आहे. भारत हा स्वतंत्र देश आहे. या देशातील जनतेला जे वाटते तेच निर्णय घ्यावे लागतात. जनतेनी आता एक विचाराने अमेरिकेपुढे झुकले जावू नये. अतिरिक्त टैरिफ हा भारतीयांना आर्थिक त्रास देण्यासाठी आहे. त्यामुळे याला सर्व ताकदलाऊन परतुन लावला पाहिजे. भारताने रशियाशी मैत्रीसंबंध सोडावेत असाच आग्रह आहे. अमेरिका हुशार आहे कारण त्याने चीन व पाकिस्तानला केवळ पंचवीस टक्केच टैरिफ लावला आहे. भारताला दुप्पट लावणे म्हणजे केवळ भारतीयांना आर्थिक त्रास देणे आहे ही बाब सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे. आज जे अमेरिकेकडून आयात वस्तू करतात त्या भारतातच बनविल्या पाहिजेत. स्वावलंबन व भारतीय कारागिरांना प्रोहत्सान देणे हे सर्वात महत्वाचे आहे. त्याच प्रमाणे अमेरिकेवर आवलंबून राहू नये. स्वयंपूर्णता आवश्यक आहे. भारताने इतर देशाशी निर्यात मोठ्या प्रमाणात वाढविली पाहिजे. केवळ आयातवर आवलंबून राहू नये तर निर्यातीवर भर दिल्यास मोठ्या प्रमाणात महसुल मिळू शकतो. जीएसटीचे अनेक थर जे कठिण आहेत. त्यामुळे कमी थर असावेत व सुटसुटीतपना असावा. त्यामुळे आता भारतीयांची एक कसोटी आहे. संकट आहे. यावर कशी मात करावयाची आहे हे एकमताने निर्णय घेणे अपेक्षित आहे.

# पिंपळातील झाडाचा गणपती; गणेशोत्सवाबरोबर जनजागृती व प्रबोधन

## आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन

**लातूर/प्रतिनिधी** :कुणीही व्यावसायिक शिल्पकार नसताना सर्व समावेशक असलेल्या ग्रीन लातूर वृक्ष सदस्यांनी पूर्णपणे स्व हाताने साकारल पिंपळाच्या झाडातील गणपती.

लाकडाचा भुसा, नारळाच्या कात्या, सिमेंटच्या रिकाम्या पोत्यांचा चुरा, मुलतानी माती, सिमेंट व थोडं बाइंडिंग मटेरियल.. या सर्वांच्या मिश्रणाने ज्येष्ठ सदस्य व कलाशिक्षक बाळासाहेब बावणे यांच्या मार्गदर्शना अंतर्गत आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन सदस्यांनी आपली कलाकारी दाखवत सलग बारा तास परिश्रम घेऊन पिंपळाच्या झाडाच्या खोडाला श्री गणेशाचे रूप दिल.

पावसाचे दिवस असल्यामुळे वॉटरप्रूफ रंगाचा वापर करण्यात आला.

आंबेजोगाई रस्ता, एस, टी. वर्कशॉप शेजारी असलेल्या पिंपळाच्या झाडातील गणपती आवर्जून पाहायला या असे आवाहन आमच ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन च्या वतीने गणेश उत्सव अध्यक्ष नागसेन कांबळे यांनी केले आहे.

गणेश उत्सव करिता कुणाजवळूनही देणगी न घेता, अवास्तव सजावट, विद्युत रोषणाई न करता ग्रीन लातूर वृक्ष सदस्यांनी देखावे उभे केले आहेत.

समाज प्रबोधनाकरिता सार्वजनिक गणेश उत्सवाचे आयोजन व्हावे असे लोकमान्य टिळक यांनी सांगितले होते त्या प्रमाणे पिंपळातील झाडाचा गणपती सोबत वृक्ष लागवड, वृक्ष संगोपन, शहर स्वच्छता, ओला कचरा, सुका कचरा, पाणी आडवा पाणी जिरवा, प्लास्टिक बाटल्यांचे पुनर्वापर, दोन्ही प्रदूषण टाळा, वाहतुकीचे नियम पाळा, रस्त्यावरून पुढे जाण्याची धावपळ करू नका, एक दिवस हॉर्न वाजवू नका, महिन्यातून एक दिवस नो व्हेईकल डे पाळा, रस्त्यावर कुठेही थुंकू नका, लोक थुंकीचंद म्हणतील, उन्हाळ्यात चिमण्या करिता गच्चीवर पाणी ठेवा, उन्हाळ्यात आपल्या परिसरातील झाडांना पाणी द्या असे विविध प्रबोधनात्मक पोस्टर बनवून जनजागृती करणे सुरू आहे.



याशिवाय एक विशेष गोष्ट म्हणजे झाडांचा कट्टा लोकांना नर्सरीमधून झाडे विकत घेणे परवडत नसल्यामुळे आपल्याकडील एखादं झाड जास्तीचे झाड झाडाच्या कट्टा या ठिकाणी आणून ठेवा आणि झाडाच्या कट्ट्यावरील एक झाड घेऊन जा अशा झाडांच्या देवाणघेवाण पद्धतीचा उपक्रम सुरू करण्यात आलेला आहे. पिंपळाच्या झाडाचा गणपती दर्शनासाठी आलेल्या सर्वांना एक झाड मोफत देण्यात येत आहे.

# राज्यातील ३८ नवीन सब स्टेशन उभारणी, वीज वाहिन्यांच्या प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करावीत – ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करत असताना या विकासासाठी उद्योग, कृषी आणि विविध क्षेत्रांना मोठ्या प्रमाणात वीज ऊर्जेची गरज भासणार आहे यासाठी महावितरणमार्फत उभारण्यात येणाऱ्या ३८ नवीन सब स्टेशन आणि वीज वाहिन्यांच्या प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करण्याकडे लक्ष दिले जावे, असे प्रतिपादन ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केले.

एमएसईबी होल्डिंग कंपनी कार्यालय फोर्ट येथे आढावा बैठक ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच झाली. बैठकीत महावितरण आणि महापारेषण अंतर्गत सुरू असलेल्या विविध सब स्टेशनची उभारणी आणि उच्च दाब वाहिनी प्रकल्प कामांचा आढावा घेतला. यावेळी संचालक (संचलन) सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) अविनाश निंबाळकर, मुख्य अभियंता महेंद्र वाळके, मुख्य अभियंता (प्रकल्प)




सुनील सूर्यवंशी, मुख्य अभियंता माणिक गुट्टे उपस्थित होते.

ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या, राज्यातील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण) अंतर्गत ३८ सब स्टेशनच्या उभारणीसाठी कार्यवाही केली जात आहे. या प्रकल्पांच्या उभारणीमुळे पुणे शहर, नागपूर येथील मिहान औद्योगिक वसाहत तसेच राज्यातील विविध ठिकाणच्या वीज पुरवठा व उपलब्धतेमध्ये मोठी सुधारणा होईल. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्याकडून मान्यता प्राप्त होऊन देखील विविध प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली नाहीत. सर्व प्रकल्प होण्यासाठी प्रशासकीय प्रक्रिया वेगाने केल्या जाव्यात, असे राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी यावेळी सांगितले.

यावेळी अमरावती करजगाव येथील १३२ केवी सबस्टेशन, पुणे शिक्रापूर येथील ७६५ किलो वॅट सबस्टेशन, पाचगाव येथील २२० केवी सबस्टेशन येथील कामे पूर्ण झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी विविध प्रकल्पातील कामांच्या गतीचा त्यांनी आढावा घेतला. यामध्ये छत्रपती संभाजी नगर, अमरावती, परभणी, हिंगोली, सातारा, पुणे यासह विविध जिल्ह्यात सुरू असलेल्या कामांची त्यांनी तपशीलवार माहिती घेतली.

# दिल्लीत गणरायाचे भक्तिमय स्वागत

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते गणरायाची प्राणप्रतिष्ठा; महाराष्ट्र सदनासह मंडळांमध्ये उत्साहाचा जयघोष



नवी दिल्ली, २७: राजधानी दिल्ली येथे आज 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात आणि ढोल-ताशांच्या निनादात लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन झाले. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी महाराष्ट्र सदनात गणरायाची विधिवत प्राणप्रतिष्ठा केली. महाराष्ट्र सदनासह दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील गणेशोत्सव मंडळांनी भक्तिमय वातावरणात गणरायाचे स्वागत केले.यंदा गणेशोत्सवाला महाराष्ट्रात राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्याने दिल्लीतील मराठी बांधवांमध्ये विशेष उत्साह आहे. पुढील दहा दिवस दिल्लीत भक्ती, उत्साह आणि मराठमोळ्या सांस्कृतिक जल्लोषाचे वातावरण राहणार आहे.

महाराष्ट्र सदनात गणरायाचे स्वागत

महाराष्ट्र सदनातील सार्वजनिक गणेशोत्सव समितीच्यावतीने गणरायाची प्राणप्रतिष्ठा खा. डॉ श्रीकांत शिंदे यांनी केली. यावेळी निवासी आयुक्त आर. विमला, अपर निवासी आयुक्त निवा जैन, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, महाराष्ट्र परिचय केंद्राच्या उपसंचालक मनिषा पिंगळे यांच्यासह अनेक अधिकारी, कर्मचारी आणि गणेशभक्त उपस्थित होते. सकाळी कोपर्निकस मार्गावर काढण्यात आलेल्या मिरवणुकीत 'गणपती बाप्पा मोरया' आणि 'मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. ढोल-ताशांचा गजर आणि मंत्रोच्चारांनी गणरायाची प्राणप्रतिष्ठा थाटामाटात संपन्न झाली.

गणरायाच्या स्वागताने दिल्लीत मराठी संस्कृतीचा ठसा पुन्हा एकदा ठळकपणे उमटला आहे. हा उत्सव भक्ती आणि सांस्कृतिक वैभवाचा अनुपम संगम असल्याचे खा. डॉ. शिंदे यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र सदनात गणेशोत्सवाचा उत्साह संपूर्ण दिल्लीला सांस्कृतिक रंगात रंगवणार आहे, असे निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी सांगितले.

महाराष्ट्र सदनातील प्रदर्शन आणि बचत गटांचे विक्री स्टॉल

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी महाराष्ट्र सदनाच्या प्रांगणात आयोजित गणेशोत्सवाच्या निमित्ताने स्वयं सहायता गटांचे प्रदर्शन व विक्री स्टॉलला भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले. मराठी संस्कृती, हस्तकला आणि परंपरांचे दर्शन घडवणाऱ्या या स्टॉल्समुळे यंदाच्या उत्सवाला विशेष रंगत आली आहे. ''हा उत्सव मराठी समाजाला एकत्र आणण्यासोबतच दिल्लीतील इतर समुदायांनाही मराठी संस्कृतीची ओळख करून देतो,'' असे डॉ. शिंदे यांनी नमूद केले. बचत गटांच्या या प्रदर्शन आणि विक्री स्टॉल्समुळे स्थानिक कारागिरांना आणि छोट्या उद्योजकांना प्रोत्साहन मिळाले असून, मराठी हस्तकलेची ख्याती दिल्लीत पोहोचली आहे.

दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील गणेशोत्सव मंडळांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तीपूर्ण जयघोषाने गणरायाचे स्वागत केले. यंदा गणेशोत्सवाला मिळालेल्या राज्य महोत्सवाच्या दर्जाने मराठी समाजाचा उत्साह द्विगुणित झाला आहे. दिल्लीतील मराठी बांधवांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून आपली सांस्कृतिक ओळख पुन्हा एकदा अभिमानाने अधोरेखित केली.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने दिल्लीत सांस्कृतिक कार्यक्रमांचा जल्लोष अनुभवायला मिळणार आहे. विविध मराठी मंडळांनी महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडवणारे कार्यक्रम आयोजित केले आहेत. मराठमोळ्या लावण्या, नाटक, संगीत रजनी, झांज पथकांचे सादरीकरण, कीर्तन, भजन संध्या आणि मराठी नाट्यप्रयोग यंदाच्या उत्सवात दिसणार आहेत. सर्व गणेशभक्तांचाही या उत्सवात मोठ्या प्रमाणात सहभाग आहे, ज्यामुळे दिल्लीत पुढील दहा दिवस भक्ती आणि उत्साहाचे वातावरण कायम राहील.

# राजभवन येथे राज्यपालांच्या हस्ते गणरायाची प्रतिष्ठापना



**मुंबई/प्रतिनिधी** : गणेश चतुर्थीनिमित्त राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज सकाळी राजभवन येथील आपल्या निवासस्थानी गणरायाची प्रतिष्ठापना केली. यावेळी राज्यपालांनी राजभवनातील अधिकारी व कर्मचारी यांचेसह गणरायाची आरती केली तसेच देशवासियांना गणेशोत्सवानिमित्त शुभेच्छा दिल्या. प्रतिष्ठापना व आरतीला राजभवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नाशिक कारागृहातील कैद्यांनी तयार केली राजभवनातील मूर्ती

राजभवनात प्रतिष्ठापित करण्यात आलेली गणेशमूर्ती शाडू मातीची असून ती नाशिक येथील केंद्रीय मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांनी साकारली आहे. नाशिकचे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या संकल्पनेनुसार ही पर्यावरणपूरक मूर्ती तयार करण्यात आली व राजभवन येथे पाठविण्यात आली.

# सुखकर्ता दु:खहर्ता: भक्ती आणि अध्यात्माची एकरूपता

# गणपतीची आरती: भक्तीचा आणि श्रद्धेचा संगम

**देवाधिदेव तू, विघ्नहर्ता तू,**
**सुखकर्ता तू, दुःखहर्ता तू.**
**तुझ्या चरणी नमन माझे,**
**आरती गाता मन हे रंगून जाई.**

गणपती बाप्पा मोरया! हा जयघोष कानी पडला की मन आपोआपच आनंदाने भरून जाते. गणेशोत्सवाचा आत्मा म्हणजे गणपतीची आरती, आणि त्यातही सुखकर्ता दुःखहर्ता ही आरती प्रत्येक मराठी घरात भक्तिभावाने गायली जाते. ही आरती केवळ स्तुतिपर नाही, तर ती गणपतीच्या दिव्य गुणांचे आणि त्याच्या कृपेचे सखोल वर्णन करणारी एक अर्थपूर्ण प्रार्थना आहे. या आरतीतील प्रत्येक ओळ गणपतीच्या रूपाचे, त्याच्या सामर्थ्याचे आणि भक्तांसाठी असलेल्या त्याच्या प्रेमाचे दर्शन घडवते.

गणपती बाप्पा मोरया! हा जयघोष केवळ एक नारा नाही, तर तो आपल्या अंतर्मनातील श्रद्धेचा, आनंदाचा आणि उत्साहाचा प्रत्यय आहे. गणपती म्हणजे चैतन्याचा, मांगल्याचा आणि



शुभकार्याचा आरंभ. गणपतीच्या आगमनाने संपूर्ण वातावरण भक्तिमय होते आणि या भक्तीचा गाभा म्हणजे त्याची आरती, विशेषतः 'सुखकर्ता दुः खहर्ता'. ही आरती नुसती शब्दांची रचना नाही, तर ती भक्तांच्या आत्म्याची आणि परमेश्वराच्या कृपेची एकरूपता आहे.

जेव्हा आपण हात जोडून ''सुखकर्ता दुःखहर्ता'' असे म्हणतो, तेव्हा आपण केवळ एका देवतेची स्तुती करत नाही, तर आपण आपल्या जीवनातील सर्व दुःखे आणि संकटे दूर करणाऱ्या एका सर्वोच्च शक्तीला शरण जात असतो. आरतीतील प्रत्येक ओळ गणपतीच्या दिव्य रूपाचे, त्याच्या सामर्थ्याचे आणि भक्तांसाठी असलेल्या त्याच्या असीम प्रेमाचे वर्णन करते. सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची किंवा कंठी झळके माळ मुक्ताफळांची यांसारख्या ओळींतून त्याचे राजसी सौंदर्य आणि भव्य रूप डोळ्यासमोर उभे राहते.

या आरतीतील प्रत्येक शब्द आध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. दर्शनमात्रे मन कामना पुरती या ओळीतून गणपतीच्या दर्शनाने मिळणाऱ्या मानसिक शांतीची आणि आत्मिक समाधानाची अनुभूती व्यक्त होते. हा अनुभव केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित नाही, तर तो आपल्या दैनंदिन जीवनातही सकारात्मकता आणतो. 'लंबोदर पितांबर फणिवर बंधना, सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना' हे वर्णन गणपतीच्या विशेष रूपाची ओळख करून देते, जे बुद्धी, विवेक आणि ज्ञानाचे प्रतीक आहे.

आरती करणे हा एक कर्मकांड नसून, ती एक आध्यात्मिक साधना आहे. यासाठी गणपतीची मूर्ती स्वच्छ ठिकाणी ठेवून, दिवा आणि धूप प्रज्वलित करून मन एकाग्र करणे आवश्यक आहे. जेव्हा आपण पूर्ण भक्तीभावाने आरती गातो, तेव्हा आपले मन शुद्ध होते आणि आपल्याला एक वेगळीच शांतता मिळते. आरतीनंतर गणपतीला अर्पण केलेला प्रसाद हा केवळ गोड पदार्थ नसतो, तर तो आपल्या श्रद्धेचा स्वीकार केल्याचे आणि गणपतीने आपल्याला आशीर्वाद दिल्याचे प्रतीक आहे.

समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेल्या या आरतीतून व्यक्त होणारी दास रामाचा ही भावना प्रत्येक भक्ताच्या मनात असते. 'संकटी पावावे निरंतरि गणराया' हे आर्जव प्रत्येक संकटात गणपती आपल्या पाठीशी असेल या विश्वासाला बळ देते. अशा प्रकारे, 'सुखकर्ता दुः खहर्ता' ही आरती आपल्याला गणपती बाप्पाच्या जवळ आणते, आत्मिक समाधान देते आणि आपल्या जीवनात सुख, शांती आणि समृद्धीचा अनुभव घडवते.

**सुखकर्ता दुःखहर्ता, विघ्नहारी दयामूर्ती,**
**कुंडलिनीचे तेज जिथे, तिथे रमतो गजानन.**
**घरोघरी आगमन तुझे, मंगलमय करो जीवन,**
**मोदकांच्या गोडीत वसतो, प्रेम करतो भक्तांप्रती.**

राहुल हरिभाऊ इंगळे पाटील
मो. ९८९०५७७१२८

## आचार्य दिव्यचेतनानंद विद्वानांनुसार, ईश्वर प्राप्तीचे ३ मार्ग

-ज्ञान, कर्म व भक्ती. खरंतर हेच ज्ञान आहे की, ज्या माध्यमातून ईश्वर कोण आहे? हे आपण जाणतो. ज्ञानाचा संग्रह आपल्या मेंदूत असतो व निर्विवादपणे हे आपणास ईश्वरकडूनच मिळते. मानवाचा मेंदू छोटा असतो मग अशा स्थितीत तो ईश्वराला कसा जाणू शकेल? हा प्रश्न निर्माण होतो. वास्तवात मेंदूत असलेल्या ज्ञानानेच हे शक्य होऊ शकते. ज्ञानामुळे मन तृप्त होते. श्रीआनंदमूर्तिके यांच्यानुसार, जोपर्यंत मानवात ज्ञानाची जाणीव राहिल तोपर्यंत त्याने ज्ञान ग्रहण करत राहिले पाहिजे. एका मर्यादेनंतर आपल्या ज्ञानाची भूक मंदावते कारण तोपर्यंत आपले लक्ष्य ईश्वर प्राप्ती होते.

काही विद्वान मानतात की, कर्मामुळे ईश्वर प्राप्ती होते कारण कर्म न करता मनुष्य एक क्षण सुद्धा जिवंत राहू शकत नाही. म्हणून आपण कर्म करत राहिले पाहिजे पण कर्म चांगले असायला हवेत. गीतेत प्रभू श्रीकृष्णाने मानवास कुठल्याही फळाची अपेक्षा न करता कर्म करत राहण्याचा सल्ला दिला आहे. सांगण्याचे तात्पर्य धार्मिक व आध्यात्मिक जगात ज्ञानाला जेवढी किंमत आहे त्यापेक्षा कमी कर्माची नाही. विद्वान म्हणतात की, जर निर्मळ भावाने ईश्वराची भक्ती केली तर ते सहज मिळतील. खरंतर भक्ती मार्गाची कास मोठ-मोठ्या ज्ञानवंतांनी चोखाळली आहे. आपण सर्व मानतो की, सृष्टीची निर्मिती ईश्वरानेच केली आहे. म्हणून जगातील प्रत्येक जीव परमात्म्याचे संतान आहे. जर आपण परमात्माला प्रसन्न करु इच्छित असाल तर त्यांची संतान म्हणजे प्रत्येक जीवप्रती प्रेम-भाव ठेवा व यासाठी आपण मानवसेवा व समाजसेवा केली पाहिजे तसेच निराधारांना आधार दिला पाहिजे. मानवसेवा करताना आपण नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हा सर्व खटाटोप ईश्वर प्राप्तीसाठी केला जात आहे. खरंतर हीच भक्ती आहे. त्यामागे दुसरे कुठलेही कारण नाही. जर भक्तीभाव निर्माण झाला तर ईश्वर प्राप्तीचा मार्ग मिळाला, असे समजा.



# कसोटी लागणार

ब्रिटनबरोबर भारताने अलीकडेच मुक्त व्यापार करार केला. जपानसह वेगवेगळ्या देशांबरोबर करार करून अमेरिकेच्या अतिरिक्त शुल्कामुळे होणार्या परिणामांची तीव्रता कमी करण्याचा भारताचा प्रयत्न आहे. तात्कालिक मार्ग शोधण्याची निकड असली तरी देशहिताच्या दृष्टीने दीर्घकाळाचा विचार डोळ्याआड होऊ देता कामा नये. भारतावर पंचवीस टक्के जादा प्रत्युत्तर शुल्क लादण्याची नोटीस अमेरिकेने बजावली. मंगळवारी मध्यरात्रीपासून शुल्क आकारणीची अंमलबजावणी सुरू झाली. रशियाकडून अमेरिकेच्या सुरक्षेला धोका असल्याचे कारण पुढे करत आणि भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याबद्दल हे शुल्क आहे. वैर रशियाबरोबर आणि त्या शत्रुत्वाचा राग भारतावर, हा उफराटा प्रकार. अर्थात तो डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारख्या मानसिक अस्थिर व्यक्तीला शोभणाराच आहे! युक्रेन आणि रशिया यांच्यातील युद्धात रशिया माघार घेण्यास तयार नाही, हे ट्रम्प यांना झोंबणारे ठरले. त्यांच्या पुढाकाराने अलास्कामध्ये बैठक झाली; पण त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही. या बैठकीच्या कितीतरी आधी रशियाचे कारण देत अमेरिकेने अतिरिक्त पंचवीस टक्के आयात शुल्काची घोषणा केली होती. रशियावर भारताने दबाव आणावा आणि युद्ध रोखण्यास भाग पाडावे, हे अमेरिकेचे तर्कट. भारताने ते जुमानले नाही आणि रशियाकडून तेल खरेदी देखील सुरूच ठेवली. चाकोरीत विचार करण्याचाच वकुब असलेल्या येथील अनेकांना उजव्या विचारसरणीच्या ट्रम्प यांचा भलताच अभिमान वाटत असे. आता ट्रम्प जिहादी मानसिकतेच्या असीम मुनीरसह पाकिस्तानच्या जिवलग मित्राच्या भूमिकेत आहेत. अतिरिक्त शुल्काचा त्यांचा निर्णय भारताची कसोटी पाहणारा ठरेल, अशी चिन्हे आहेत. आपण कृषी, कुक्कुटपालन, दुग्धजन्य पदार्थ यांचे क्षेत्र अमेरिकेला खुले करण्यास ठाम नकार दिल्याने हे निर्बंध लादण्यात आले आहेत, हे म्हणणे बरोबर असले तरी त्यातून परराष्ट्र धोरणाचे अपयश लपवता येत नाही. समर्थ भारताचा जगभर घोष करताना भारताच्या प्रगतीआड येणारे कोणते देश असू शकतात, त्यांच्याकडून कोणती टोकाची पावले उचलली जाऊ शकतात, याचे भान असणे आवश्यक होते. व्यापार करारासाठी चर्चेच्या फेर्यांमधून काहीही पुढे आले नसले तरी चर्चेला पूर्णविराम, हा मार्ग नव्हता.

चीनला सवलत-चीनदेखील रशियाकडून तेलाची खरेदी करतो; पण चीनवर अतिरिक्त शुल्क लादण्याचे धाडस ट्रम्प यांना नाही. 'आपण चीनला उद्ध्वस्त करू शकतो, पण चांगल्या संबंधांसाठी आपण तसे करणार नाही', असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. याचाच अर्थ चीनला आतातरी दुखावण्याची चूक ते करणार नाहीत. रशिया, भारत आणि चीन यांची सध्या दिसत असलेली आणि वाढण्याची शक्यता असलेली जवळीक अमेरिकेसमोर नवे प्रश्न निर्माण करेल, हे त्यांना ठाऊक आहे. चीनचे विद्यार्थी अमेरिकेत येऊन संशोधनाची चोरी करतात, असा ठपका ट्रम्प यांनीच ठेवला होता. चीनला भारत आणि रशियापासून दूर करण्यासाठी प्रत्युत्तर शुल्कात सवलत देण्याबरोबरच त्यांनी सहा लाख चिनी विद्यार्थ्यांना अमेरिकी विद्यापीठाची दारे उघडली आहेत. मधल्या काळात चीनबरोबर तणाव वाढला असताना भारताने चीनवर काही निर्बंध लादले, असे जाहीर झाले. प्रत्यक्षात चीनकडून भारतात होणार्या निर्यातीचे प्रमाण मोठे आहे. आता तर सीमा वाद, तिबेटसह चीनबरोबरील सर्व वादाचे मुद्दे भारताला काही काळ बाजूला ठेवणे भाग आहे. रशियाने व्यापारासंदर्भात मदतीची ग्वाही दिली असली तरी आजघडीला युद्धामुळे रशियाचे हात बांधले गेले आहेत. त्यामुळे बाजारपेठेसाठी चीनवर आपली भिस्त राहणार आहे. अमेरिकेने लादलेल्या शुल्कामुळे दागिने, रत्नजडित आभूषणे, चामड्याच्या वस्तू, कापड, फर्निचर या क्षेत्रातील रोजगारावर परिणाम होण्याची भीती आहे. भारत जागतिक उत्पादनाचे केंद्र बनावे, यासाठी सातत्याने घो-षणा होतात; पण बाजारपेठा महत्त्वाच्या आहेत, हे अमेरिकेने लादलेल्या शुल्कामुळे अधोरेखित झाले. नोटाबंदीनंतर देशातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना फटका बसला. त्यांना खरी उभारी मिळाली का, याची पडताळणी करणे सरकारला गरजेचे वाटले असे दिसले नाही. 'स्वदेशी' उत्पादनांची खरेदी वाढावी यासाठी आता व्यापक मोहिमा सुरू होतील. त्या देशहिताच्याच आहेत; पण त्याचवेळी बलाढ्य देशांकडून भारत एकाकी पडू नये यासाठी व्यूहरचना महत्त्वाची ठरेल.

# शरीरासाठी अत्यंत गुणकारी आहे हे फळ

## अनेकजण खाण्यासाठी मुरडतात नाक

दुधी भोपळ्याच्या भाजीचं नाव ऐकताच अनेक जण नाक मुरडतात. परंतु, न आवडणाऱ्या दुधी भोपळ्याचे फायदे ऐकून तुम्ही थक्क व्हाल. भोपळ्यामध्ये व्हिटॅमिन ए, सी, बी, के, ई, पोटॅशिमय, मॅग्नेशियम तसंच लोह मुबलक प्रमाणात आढळत. दुधीच भोपळ्याचा रस प्यायल्यास बेली फॅट तसंच शरीरातील इतर फॅट कमी करण्यास मदत होते. तसंच हाडं मजबूत करण्यासाठी हे फायदेशीर आहे. त्याचबरोबर तणाव व्यवस्थापण करण्यासाठी देखील दुधी महत्त्वाची भूमिका बजावते. दुधी सर्व पोषक तत्वांचे शक्तीस्थान आहे, असं आहारतज्ञ आणि वजन व्यवस्थापन तज्ञ डॉ. प्रत्यक्षा भारद्वाज यांचं मत आहे. जर तुम्हाला दुधी भोपळा आवडत असेल तर तुम्ही आठवड्यातून एकदा याचा रस पिऊ शकता.



दुधी भोपळ्याचे आरोग्यदायी फायदे

दुधीच्या रसाचे फायदे

श्वसन रोग: दुधी भोपळा हा लघवीचे प्रमाण वाढवणारा तसंच कार्डिओ टॉनिक पदार्थ आहे. यामुळे अल्सर श्वसनासंबंधित विकार, वेदना आदींवर उपचार करण्यासाठी फायदेशीर ठरतो.

दुधी भोपळ्याचे आरोग्यदायी फायदे

युरिक ॲसिड: शरीरातील युरिक ॲसिडचे प्रमाण वाढले असल्यास सूज येवू शकते. परिणामी गुडघेदुखीचा त्रास होतो. या समस्येपासून मुक्तता हवी असल्यास दुधी भोपळा उपयुक्त आहे. कारण यात व्हिटॅमिन सी आणि बी, लोक तसंच पोटॅशियम सारखे आवश्यक पोषक घटक आढळतात. यामुळे सकाळी उपाशी पोटी भोपळ्याचा रस प्यायल्यास युरिक ॲसिडची पातळी कमी होण्यास मदत होवू शकते.

वजन कमी करण्यासाठी उपयुक्त: भोपळ्यामध्ये व्हिटॅमिन ए, सी, बी, के, ई, पोटॅशिमय, मॅग्नेशियम तंसच लोह मुबलक प्रमाणात आढळतात. जे वजन कमी करण्यासाठी फायदेशीर आहेत. तसंच यात फॅटचे प्रमाण कमी आहे त्याचबरोबर फायबर मुबलक प्रमणात आहे यामुळे पचनक्रिया सुरळीत होते. तसंच शरीराला उर्जा वाढवण्यासाठी हे उत्तम पेय आहे. याच्या सेवनानं मेटाबॉलिज्म वेगात होतो. परिणामी वेगानं शरीरातील चरबी घटवण्यास मदत होते.

शरीरातील घाण काढण्यासाठी चांगलं: दुधीचा रस शरीर नैसर्गिकरित्या डिटॉक्स करते. शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यासाठी भोपळ्याचा रस सर्वोत्तम आहे. यातील अँटीऑक्सिडंट्स शरीरातील विषारी घटक बाहेर काढण्यास मदत करतात. याकरिता एक ग्लास भोपळ्याचा रस सकाळी रिकाम्या पोटी प्यावं.

रक्तदाब नियंत्रण: दुधी भोपळ्यातील पौष्टिक घटक रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास देखील मदत करतात. यातील व्हिटॅमिन सी आणि फ्लेव्होनॉइड्स थ्रोमबॉक्सेन नावाचं घटक रक्त पातळ करतो. यामुळे रक्तदाबाची समस्या टाळता येवू शकते. रक्तदाब नियंत्रित ठेवायचं असल्यास भोपळ्याची भाजी किंवा रसाचं नियमित सेवन करावं.

पोटाच्या आरोग्यासाठी फायदेशीर: कॉन्स्टिपेशन समस्या असलेल्यासाठी हे गुणकारी आहे. पोट साफ न होणे तसंच कठीण स्वरूपात शौचास होणे यासारख्या समस्या असलेल्या व्यक्तींनी भोपळ्याचं रस प्यायाल्यास त्यांना फायदा होवू शकतो. यातील फायबर पोट स्वच्छ ठेवण्यास मदत करते.

दुधी भोपळ्याचा रस बनवण्याची पद्धत

सर्वप्रथम दुधी चिरून घ्या. चिरलेल्या दुधीचे तुकडे ब्लेंडरनं व्यवस्थित ब्लेंड करून घ्या. दुधी भोपळ्याचा रस तयार आहे. परंतु आतड्या किंवा पोटासंबंधित समस्या असलेल्या व्यक्तींनी कच्च्या भोपळ्याचं रस पिऊ नये. त्यांनी सर्वप्रथम दुधीवरी साल काढून चिरून घ्यावी. कापलेला भोपळा कुकुरमध्ये घाला आणि त्यात थोडं पाणी टाकून शिजवा. शिजलेली दुधी मिक्सरच्या भांड्यात घाला आणि बारीक करून घ्या. तयार झालेल्या रसात जिरेपूड, आलं, पुदिन्याची पानं, लिंबाच रस, काळी मिरी पावडर आणि चवीनुसार मीठ घाला आणि प्या. थंड हवं असेल तर त्यात २-३ बर्फाचे तुकडे घालून प्या.

## डॉक्टर टीप्स

### डाएटकट्टा । कमी खाण्यापेक्षा कमी वेळा खाल्ल्याने आजारांवर मात । डॉ. दीक्षित

हेल्थ टिप्स-दिवसातून फक्त दोनवेळा जेवण घेतलं पाहिजे आणि कमी जेवण्यापेक्षा कमी वेळा जेवणं गरजेचं आहे असंही डॉ. दीक्षित म्हणाले. दोनवेळा जेवतानाही ते जास्तीत जास्त ५५ मिनिटांमध्ये संपवणं गरजेचं आहे. हा डाएटप्लॅन फॉलो केल्यास वजन कमी होईल, पोटाचा घेर कमी होईल, रक्तातील तीन महिन्यातील कळणारं साखरेचं प्रमाण कमी होईल आणि फास्टिंग शु-



गरही कमी होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. एकदा जेवतो तो योगी, दोनवेळा जेवतो तो भोगी आणि तीन-वेळा जेवतो तो रोगी अशी संतांची शिकवण आहे, याचाही दाखला त्यांनी दिला. आहारात हे बदल केल्यामुळे वजन कमी होईल, पोटाचा घेर कमी होईल असा विश्वास त्यांनी कट्ट्यावर व्यक्त केला.

## विनोद




एक माणूस भिकाऱ्याला दटावतो,

'अरे एवढा धडधाकट आहेस. भीक काय मागतोस. कष्ट कर.'

'साहेब, मोठ्या कष्टाने चोरी केली तर तुरुंगाची हवा खायला लागली.'

## संदेश

Teacher- Bataao bachcho jo galat kaam karte hain wo kaha jate hain??
Student- sharmate huye bola sir.. Manuabhaan tekri, EKAANT park, Chinar park, MAYUR park...

## सुविचार

स्वत:ची इच्छा पूर्ण न झाल्याने अस्वस्थ होणारी माणसं किती आहे हे मोजण्याची गरज नाही , आणि दुसऱ्याची इच्छा आणि गरज पुरी करता आली नाही म्हणून अस्वस्थ होणारा विरळाच !

– शेक्सपिअर




### संस्कृत सुभाषित

**कालभोजनमारोण्यकराणां श्रेष्ठम् ।।**

**अर्थ:**–व्यवसायानुसार भोजनाची वेळ वेगळी असली तरी त्यावेळी नित्यनियमितपणे भोजन घेणे हे श्रेष्ठ असते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. पटकन, चटकन
४. प्राणी
७. विसराळू
१०. मायेची सावली
१२. पातळ खांब
१५. कपाळ
१७. आईचा भाऊ
१९. मज्जाव
२०. फुरसत
२१. एक श्वासरोग
२२. नवरा
२३. भाकरीचे एक धान्य
२४. उद्याच्या नंतरचा दिवस
२६. माहेरी आलेली स्त्री
२८. पूर्ण भरतीची वेळ
२९. दिवटी
३२. महासर्प
३५. पाणी
३६. चलनवलन
३९. तमाशा
४०. थेट
४१. केशरी गराचे व हिरव्या सालीचे फळ
४३. संरक्षणाचे आवरण
४४. दात
४५. पहारेकरी
४८. स्वत:ला
४९. गोंजारणे, समजूत काढणे
५०. अखंड
५१. मैत्रीण
५२. तोंड
५३. पुन्हा पुन्हा
५७. जिवलग
६०. चेष्टा, टिंगलटवाळी
६१. सीतेचे वडील
६३. एक चतुर्थांश
६५. माफी मागणारा
६७. छोट्यांची गाणी
७०. चांदीचा बिल्ला
७३. चिंचेची चव
७४. तात्पुरते रुसणे
७५. कोर्टातील कथन
७६. सोन्याची फुले उधळून घेण्याचे हक्कदार
७७. सबब, निमित्त

### उभे शब्द

१. टप्प्या टप्प्यानी केलेला प्रवास
२. अलमारी
३. निर्जीव तरी वाढणारे
५. चौक
६. पाठविलेला
८. मध्यम प्रमाण
९. आकांत करणे
११. रमापती
१३. शिर्डीचे संत
१४. कट्टर
१६. तिबेटी धर्मगुरु
१८. संगीतातील एक राग
१९. मृत्यू
२५. लक्ष्मी
२६. सामान
२७. थंड
३१. रेशमी वीण असलेल्या पदराची साडी
३२. फावला वेळ
३३. विश्व
३४. अखबार
३६. जादू
३७. रेशमाची गुंडाळी
३८. गडीमाणसे
४१. आपले नसलेले
४२. प्रश्न
४३. विद्या
४६. अफूचे बी
४७. निकट, जवळ
४८. मनातील इमले
५१. हेतूपूर्वक
५३. तपासणी करणारा, पारखी
५४. मुलगी
५५. धोबी
५६. शरीर
५८. वैयक्तिक
५९. मेहेरबानी
६२. खाण्यासाठी भाजलेले मांसाचे गोळे
६४. राबता, जाणे येणे
६६. पाऊले
६८. खोटी तात्पुरती भावना
६९. युवक
७०. चांदी
७१. अर्धी ओंजळ
७२. सावध
७३. आम्रफल

### आडवे उत्तर

१.मटकन ४.जनावर ७.विसरभोळा १०.पाखर १२.वासा १५.ललाट १७.मामा १९.मनाई २०.सवड २१.दमा २२.वर २३.बाजरी २४.परवा २६.माहेरवाशीण २८.समा २९.मशाल ३२.अजगर ३५ जल ३६.हालचाल ३९.वग ४०.तडक ४१.पपनस ४३.कवच ४४.रद ४५.रखवालदार ४८.मला ४९.चुचकारणे ५०.सलग ५१.सखी ५२.मुख ५३.परत परत ५७.सखा ६०.थट्टामस्करी ६१.जनक ६३.पाव ६५.क्षमायाचक ६७.बालगीत ७०.रौप्यपदक ७३.आंबट ७४.रुसवा ७५.साक्ष ७६.पणजोबा ७७.कारण

### उभे उत्तर

१.मजल दर मजल २.कपाट ३.नख ५.नाका ६.रवाना ८.सरासरी ९.भोकाड पसरणे ११.रमावर १३.साईबाबा १४.कडवा १६.लामा १८.मारवा १९.मरण २५.रमा २६.माल २७.शीतल ३१.टोपपदर ३२.अवसार ३३.जग ३४.समाचारपत्र ३६.हा-तचलाखी ३७.लड ३८.चाकरचुकर ४१.परका ४२.सवाल ४३.कला ४६.खसखस ४७.लगत ४८.मनोरथ ५१.सकाम ५३.परीक्षक ५४.तनया ५५.रजक ५६.तन ५८.खाजगी ५९.कृपा ६२.कबाब ६४.वहिवाट ६६.चरण ६८.लटका ६९.तरुण ७०.रौप्य ७१.पसा ७२.दक्ष




## थोडक्यात/ संक्षिप्त

### आर. अश्विनने आयपीएलला दिला निरोप! म्हटले ''प्रत्येक शेवट ही एक...''

चेन्नई -भारतीय ऑफ स्पिनर रविचंद्रन अश्विनने इंडियन प्रीमियर लीग मधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे. पण याबरोबरच टीम इंडियाच्या या अनुभवी गोलंदाजाने हे देखील स्पष्ट केले आहे की, तो जगभरातील विविध लीगमध्ये भाग घेणार आहे.
आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीनंतर आता आयपीएल ला ही निरोप अश्विनने १८ डिसेंबर २०२४ रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या गाब्बा कसोटीनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला होता, तेव्हा त्याने आयपीएलमध्ये खेळणे सुरू ठेवणार असल्याचे सांगितले होते. तो आयपीएल २०२५ मध्ये चेन्नई सुपर किंग्जकडून खेळला. जिथे त्याने ९ सामन्यांमध्ये ७ विकेट घेतल्या आणि ३३ धावा केल्या. २०२५ मध्ये सीएसकेच्या संघर्षादरम्यान अश्विन इतर वादांमध्येही अडकला होता.
आर. अश्विनची आयपीएल कारकीर्द
३८ वर्षीय ऑफ-स्पिनर अश्विनने २२१ आयपीएल सामन्यांमध्ये १८७ विकेट्स घेतल्या आहे. त्याचा इकॉनॉमी रेट ७.२० होता. त्याची सर्वोत्तम गोलंदाजी ४३४ अशी आहे. याशिवाय, त्याने ९८ डावांमध्ये ८३३ धावा केल्या. त्यांची सर्वाधिक धावसंख्या ५० अशी होती. अश्विन इंडियन प्रीमियर लीगमध्ये आतापर्यंत ५ संघांसाठी खेळला आहे. तो चेन्नई सुपर किंग्ज, पंजाब किंग्ज, दिल्ली कॅपिटल्स, राजस्थान रॉयल्स आणि रायझिंग पुणे सुपरजायंट्सकडून खेळला. तसेच त्याने या लीगमध्ये पंजाबचे नेतृत्वदेखील केले होते. अश्विनने त्याच्या निवृत्ती पोस्टमध्ये लिहिले - ''आज माझ्यासाठी एक खास दिवस आहे आणि म्हणूनच एक नवीन सुरुवात देखील आहे, असे म्हटले जाते की प्रत्येक शेवट एक नवीन सुरुवात घेऊन येतो, माझी आयपीएल कारकीर्द आता संपत आहे, परंतु जगभरातील वेगवेगळ्या लीगमध्ये नवीन क्रीडा अनुभवांचा माझा प्रवास आजपासून सुरू होतो. मला संस्मरणीय अनुभव आणि संधी देणाऱ्या सर्व फ्रँचायझींचा मी आभारी आहे. सर्वात जास्त ऽखझङ आणि ऽइउउख चे आभार, ज्यांनी आतापर्यंत मला खूप काही दिले आहे. येणाऱ्या काळाचा आनंद घेण्यासाठी मी उत्सुक आहे.'

***

### ऑस्ट्रेलियाच्या वर्ल्डकप विजेता कर्णधार मायकेल क्लार्कला त्वचेचा कॅन्सर

मुंबई -ऑस्ट्रेलियाच माजी कर्णधार आणि जगातील आघाडीचा फलंदाज मायकल क्लार्क यांना त्वचेच्या कर्करोगाचे निदान झाले आहे. क्लार्कने इंस्टाग्रामवर लिहिले, ''त्वचेचा कर्करोग खरा आहे, विशेषत: ऑस्ट्रेलियात. आज पुन्हा माझ्या नाकातून एक गाठ काढली गेली. त्वचेची तपासणी करा, ही एक मैत्रीपूर्ण आठवण आहे. प्रतिबंध हा उपचारापेक्षा चांगला, पण माझ्यासाठी नियमित तपासण्या आणि लवकर ओळख महत्त्वाची आहे. डॉ. बिश सोलीमन यांनी हे लवकर पकडले, यासाठी मी खूप आभारी आहे.''ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार मायकल क्लार्क हा असा क्रिकेटपटू आहे ज्याने आपल्या खेळाच्या बळावर संपूर्ण एका युगाची व्याख्या केली. सुंदर स्ट्रोक प्ले आणि तीक्ष्ण क्रिकेटिंग बुद्धिमत्तेसाठी ओळखल्या जाणाऱ्या क्लार्कने २००४ ते २०१५ या कालावधीत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये चमकदार कामगिरी केली. क्लार्कने २००४ ते २०१५ या काळात ऑस्ट्रेलियासाठी ११५ कसोट्या, २४५ एकदिवसीय सामने आणि ३४ टी-२० सामने खेळले. त्यांनी कसोटी आणि एकदिवसीय संघाचे नेतृत्व केले. त्यांच्या कर्णधारपदाच्या काळात ऑस्ट्रेलियाने २०१३-१४ मध्ये ॲशेस मालिकेत ५-० अशी विजयाची नोंद केली तसेच २०१५ मध्ये विश्वचषक जिंकला.क्लार्कची त्वचेच्या कर्करोगाशी लढाई २००६ पासून सुरू आहे, जेव्हा त्यांना पहिल्यांदा निदान झाले होते. २०१९ मध्ये, त्यांनी उघड केले की डॉक्टरांनी तीन नॉन-मेलेनोमा जखम काढून टाकल्या आहेत. त्यावेळी, क्लार्कने सूर्यप्रकाशापासून स्वत:चे संरक्षण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

***

### अश्विनने आयपीएलमधून कमावले १०० कोटी

मुंबई-भारताचा स्टार गोलंदाज आर अश्विन याने जवळपास आठ महिन्यापूर्वी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. मात्र त्याने २७ ऑगस्ट रोजी अचानकपणे आयपीएलमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून त्याने निवृत्ती घोषणा केली. अश्विनने २००९ मध्ये चेन्नई सुपरकिंग्समधून आयपीएलमध्ये पदार्पण केले. त्यानंतर आर अश्विन आयपीएलमधील वेगवेगळ्या संघांकडून या लीगमध्ये खेळला. त्यानंतर आयपीएल २०२५ च्या मेगा ऑक्शनमध्ये त्याला पुन्हा

# नीरज चोप्रा डायमंड लीगच्या अंतिम फेरीत

नवी दिल्ली : भारताचा नामांकित भालाफेकपटू नीरज चोप्रा याची ओळख जगातील सर्वोत्तम ॲथलिट्सपैकी एक म्हणून केली जाते. ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदके जिंकणारा तो एकमेव भारतीय आहे. आता नीरजने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. तो डायमंड लीग २०२५ च्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरलेला आहे. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत एकूण ७ खेळाडूंमध्ये नीरजचा समावेश झाला आहे. विजेतेपदाच्या शर्यतीत नीरजसमोर ग्रेनेडाचा अँडरसन पीटर्स आणि जर्मनीचा ज्युलियन वेबर यांसारखे बलाढ्य प्रतिस्पर्धी असणार आहेत. या सामन्यांमध्ये नीरजची कामगिरी निर्णायक ठरणार आहे. भारतीय क्रीडाप्रेमींच्या आशा पुन्हा एकदा नीरजवर केंद्रित झाल्या आहेत. त्याच्यासह आणखी सहा आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी अंतिम फेरीत प्रवेश मिळवला आहे, ज्यात एड्रियन मार्डरि (मोल्डोव्हा), अँडरसन पीटर्स (ग्रेनेडा - गतविजेता), केशॉर्न वॉलकॉट (त्रिनिदाद आणि टोबॅगो), ज्युलियन वेबर (जर्मनी), ज्युलियस येगो (केनिया) आणि सायमन वाईलँड (स्वित्झर्लंड) यांचा समावेश आहे. नीरज चोप्राने आपली शेवटची स्पर्धा ५ जुलै रोजी बेंगळुरू येथे पार पडलेल्या एनसी क्लासिकमध्ये खेळली. या स्पर्धेत त्याने ८६.१८ मीटरची भालाफेक करत विजेतेपद पटकावले. या हंगामात नीरजने एकूण ६ स्पर्धांमध्ये भाग घेतला, ज्यात ४ वेळा विजेतेपद आणि २ वेळा उपविजेतेपद मिळवले. आता त्याचे लक्ष्य १३ ते २१ सप्टेंबरदरम्यान टोकियोमध्ये होणार्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेवर आहे, जिथे तो आपले विजेतेपद राखण्याच्या निर्धाराने उतरणार आहे.






## लिओनेल मेस्सी भारतात येणार

मुंबई : अर्जेंटीनाचा स्टार खेळाडू लिओनेल मेस्सी भारतात फ्रेंडली सामना खेळण्यासाठी येणार आहे. अर्जेंटीना फुटबॉल असोसिएशनने याबाबत अधिकृत माहिती दिली आहे.दिग्गज फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी भारत दौर्यावर येणार असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. दरम्यान त्याच्या भारत दौर्यावर अखेर शिक्कामोर्तब झाले आहे. लिओनेल मेस्सीचा संघ येत्या नोव्हेंबर महिन्यात फ्रेंडली सामना खेळण्यासाठी केरळमध्ये दाखल होणार आहे. अर्जेंटीना फुटबॉल असोसिएशनने याबाबत अधिकृत माहिती दिली आहे.
अर्जेंटीना फुटबॉल असोसिएशनने आपल्या प्रेस रिलीजमध्ये म्हटले की, लिओनेल स्कोलोनीच्या नेतृत्वात अर्जेंटीनाचा राष्ट्रीय संघ २०२५ मध्ये २ फिफा फ्रेंडली सामने खेळणार आहे. पहिला सामना ६ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर दरम्यान युएसए संघाविरूद्ध खेळला जाईल. तर दुसरा १० नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर दरम्यान अंगोलातील लुआंडामध्ये आणि भारतातील केरळमध्ये खेळवला जाणार आहे. अर्जेंटीना संघाला फिफा वर्ल्डकप जिंकण्यासाठी बरेच वर्ष वाट पाहावी लागली होती. यादरम्यान त्यांना केरळकडूनही चांगला पाठिंबा मिळाला होता. त्यामुळे अर्जेंटीनाने फिफा वर्ल्डकपची ट्रॉफी जिंकल्यानंतर केरळचेही आभार मानले होते.

## बाजीद खानचा सूर्यकुमार यादव याच्यावर निशाणा

मुंबई : आशिया चषक स्पर्धे साठी पाकिस्तान संघापाठोपाठ भारतीय क्रिकेट संघाची घोषणा झाली. या स्पर्धेत भारत-पाकिस्तान यांच्यात रंगणार्या सामन्यासंदर्भात चर्चा सुरु असताना पाकिस्तानच्या माजी क्रिकेटर विराट कोहली आणि रोहित शर्माच्या खांद्यावरून भारतीय संघाच्या टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याच्यावर निश-णा साधला आहे. आशिया चषकासाठी भारतीय संघाने निवडलेल्या संघातील उणीवा काढत पाक क्रिकेटरने सूर्यकुमार यादव आणि भारतीय संघासाठी आशिया चषक स्पर्धा आव्हानात्मक असल्याचे म्हटले आहे.
माजी क्रिकेटर बाजीद खान याने दिलेल्या मुलाखतीत भारतीय संघाबद्दल म्हणाला की, 'संघात सर्व उच्च स्तरिय खेळाडू आहेत. संघातील खेळाडूंच्या क्षमतेवर शंका घेऊ शकत नाही. पण विराट कोहली आणि रोहित शर्मा ही दोघे ज्याप्रमाणे भारतीय संघात ऊर्जा भरत होते, त्याची उणीव नक्कीच भासेल.बाजीद खान याने यावेळी भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याच्यावरही निशाणा साधला. सूर्यकुमार यादव याने जवळपास सर्व संघाविरुद्ध धावा केल्या आहेत. पण पाकिस्तान विरुद्ध तो फिका ठरला.
जलदगती गोलंदाजांचे आक्रमण असो किंवा त्यामागे आणखी काही कारण असो, पण तो पाकिस्तान विरुद्ध संघर्ष करताना दिसला आहे. आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सूर्याने आतापर्यंत पाकिस्तानविरुद्ध ५ सामने खेळले आहेत. यात त्याने १२.८० च्या सरासरीसह फक्त ६४ धावा केल्या आहेत. विराट कोहली आणि रोहित शर्माशिवाय भारतीय संघाला रवींद्र जडेजाचीही उणीव भासणार आहे. अक्षर पटेलच्या रुपात टीम इंडियात त्याच्या जागी उत्तम खेळाडू मिळाला आहे. पण जडेजा हा टीम इंडियातील संतुलन कायम ठेवण्यात सर्वोत्तम पर्याय होता. त्याच्या अनुपस्थितीत टीम इंडियासमोर एक वेगळे आव्हान असेल, असे मतही पाकच्या माजी क्रिकेटरनं व्यक्त केले आहे.




## प्रो कबड्डीला २९ ऑगस्टपासून




मुंबई : येत्या २९ ऑगस्टपासून प्रो कबड्डी लीगचा बारावा सीझन सुरु होतो. याच पार्श्वभूमीवर यू मुम्बा संघाने आगामी सीझनसाठी नव्या जर्सीचे अना-वरण केले. यू मुंबाचा कर्णधार सुनील कुमार आणि संघमालक रॉनी स्क्रूवाला यांच्यासह सीईओ सुहेल चंडोक, अनिल चपराना यांच्या उपस्थितीत मुंबईमध्ये जर्सी लॉन्चिंगचा हा कार्यक्रम पार पडला. यावेळी कर्णधार सुनील कुमारनं दहा वर्षांनी संघाला दुसर्यांदा जेतेपद मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला.
२०१५ साली अनुप कुमारच्या नेतृत्वात यू मुंबानं एकमेव विजेतेपद पटकावलं होतं. मात्र त्यानंतर गेल्या अनेक सीझनमध्ये यू मुंबा संघाला विजेतेपदानं हुलकावणी दिली. मात्र यावेळी यू मुंबाचा संघ विजेतेपदाचा दुष्काळ संपवण्यासाठी उत्सुक आहे. दहा वर्षांपूर्वीच्या त्या जेतेपदाची पुनरावृत्ती करणार असल्याचं कर्णधार सुनील कुमारनं म्हटलंय. २०१५ साली प्रो कबड्डी लीगच्या दुसर्या सीझनमध्ये मुंबईनं विजेतेपदावर आपलं नाव कोरलं होते. यू मुंबाचा कर्णधार सुनील कुमारनं गेल्या काही वर्षांपासून यू मुंबाच्या कामगिरीचा खालावलेला आलेख उंचावण्याचा चांगलाच प्रयत्न केला आहे. गेल्या वर्षी यू मुंबा संघाचं कर्णधारपद सुनील कुमारकडे आलं. त्यानंतर त्यानं उत्तम प्रकारे संघाची बांधणी केली.प्रो कबड्डीच्या अकराव्या सीझनमध्ये त्याचा परिणामही दिसून आला.
संघाला प्ले ऑफ पर्यंत नेलं. मात्र यावर्षी

## शाकीब अल हसनच्या ५०० बळी पुर्ण




ढाका : कॅरेबियन टी-२० लीगमध्ये बांगलादेशाच्या क्रिकेटपटूने मोठा डाव साधला आहे. या स्पर्धेतील सेंट किट्स अँड नेविस पॅट्रियट्स विरुद्धच्या सामन्यात अँटिगुआ अँण्ड बारबुडा फाल्कन्सच्या ताफ्यातून मैदानात उतरलेल्या शाकीब अल हसन याने ३ बळी घेत टी-२० कारकिर्दीत ५०० बळींचा पल्ला गाठला.
या कामगिरीसह खास वर्ल्ड रेकॉर्ड त्याच्या नावे झाला आहे. कॅरेबियन लिग स्पर्धेत या त्याने फक्त ११ धावा खर्च करत पाकिस्तानचा महमद रिझवान, कायल मेयर्स आणि नवीन बिदेसी या तिघांची शिकार केली. टी-२० कारिकिर्दीत ७००० धावा आणि ५०० बळी घेणारा तो पहिला खेळाडू ठरला आहे. शाकिब अल हसन याने आपल्या टी-२० कारकिर्दीत आतापर्यंत ५०२ बळी घेतल्या आहेत. छोट्या फॉरमॅटमध्ये पाचशे बळींचा डाव साधणारा तो बांगलादेशचा पहिला तर क्रिकेट जगतातील पाचवा गोलंदाज ठरला.
टी-२० क्रिकेटमध्ये ५०० बळी घेणारे गोलंदाज
राशीद खान (अफगाणिस्तान) - ६६० बळी
ड्वेन ब्रावो (वेस्ट इंडिज) -६३१ बळी
सुनील नरेन (वेस्ट इंडिज) -५९० बळी
इमरान ताहिर (दक्षिण आफ्रिका) -५५४ बळी

## राशिद खान करणार अफगाणिस्तानचे नेतृत्त्व




काबूल : आशिया चषक २०२५ स्पर्धेचा थरार येत्या ९ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. या स्पर्धेचे आयोजन युएईत केले जाणार आहे. आगामी टी-२० वर्ल्डकप २०२५ स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर या स्पर्धेचे आयोजन देखील टी-२० फॉरमॅटमध्ये केले जाणार आहे. त्यामुळे टी-२० वर्ल्डकपआधी आशिया चषकात चौकार आणि षटकारांचा पाऊस पाहायला मिळू शकतो. या स्पर्धेसाठी भारत आणि पाकिस्तानने आ-पला संघ जाहीर केला आहे. नुकताच अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने आशिया चषकासाठी अफगाणिस्तानचा संघ जा-हीर केला आहे. आशिया चषकासाठी अफगाणिस्तान संघाच्या नेतृत्वाची धुरा अनुभवी खेळाडू राशिद खानकडे सोपवण्यात आली आहे. तर अजमतुल्लाह उमरजई आणि मोहम्मद नबीसारख्या अनुभवी खेळाडूंना देखील या संघात स्थान देण्यात आलं आहे. या संघात प्रमुख फलंदाज म्हणून इब्राहीम जादरान आणि रहमनुल्लाह गुरबाज यांना संधी देण्यात आली आहे. या दोघांची गेल्या काही सामन्यातील कामिगिरी पाहता या जोडीकडे डावाची सुरूवात करण्याची जबाबदारी दिली जाऊ शकते. या संघात संघातील सर्वात अनुभवी खेळाडू नबीचा देखील समावेश करण्यात आला आहे.
वेगवान गोलंदाज म्हणून नवीन उल हकला संघात स्थान देण्यात आलं आहे. नवीन उल हकने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दमदार गोलंदाजी केली आहे. त्याच्या नावे ६७ गडी बाद करण्याची नोंद आहे.यासह फजलहक फारूकीचा देखील संघात समावेश करण्यात आला आहे. तर फिरक गोलंदाज म्हणून या संघात कर्णधार राशिद खानसह नूर अहमद आणि अल्लाह गजनफर यांना देखील संधी देण्यात आली आहे. अफगाणिस्तानचा पहिला सामना ९ सप्टेंबरला हाँगकाँग संघाविरूद्ध होणार आहे.
अफगाणिस्तानचा संघ: रहमानुल्लाह गुरबाज, राशिद खान (कर्णधार) , इब्राहीम जादरान, दरविश रसूली, सेदिकुल्लाह अटल, अजमतुल्लाह उमरजई, करीम जनत, नबी,इशाक, मुजीब उर रहमान, गुलबदीन नईब, शराफुद्दीन अशरफ, अल्लाह गजनफर, नूर अहमद, फरीद मलिक, नवीन उल हक, फजलहक फारूकी
राखीव खेळाडू- वफीउल्लाह ताराखिल, अब्दुल्ला अहमदजई, नांग्याल खारोटे

# अजिंक्य रहाणेने सोडले मुंबई संघाचे कर्णधारपद





मुंबई : भारतीय क्रिकेटमधील अनुभवी खेळाडू अजिंक्य रहाणे यानं मुंबई क्रिकेट टीमच्या कर्णधारपदावरुन पायउतार होण्याचा निर्णय घेतला आहे. अजिंक्य रहाणे यानं ही घोषणा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरुन एक्सवर पोस्ट करत केली. अजिंक्य रहाणे यानं कर्णधारपद सोडल्यानं मुंबई क्रिकेटचा नवा कॅप्टन कोण होण-ार असा प्रश्न निर्माण झाला आहे. मुंबई संघाचं नेतृत्व करणं आणि स्पर्धा जिंकणं हे सन्मानजनक आहे.देशांतर्गत क्रिकेटचा नवा सीझन सुरु होत आहे, मला वाटतं नवं नेतृत्व विकसित होण्यासाठी योग्य वेळ आहे, त्यामुळं यापुढं मुंबईच्या टीमचं कर्णधारपद न स्वीकारण्याचा निर्णय घेतलाय. कर्णधार पद सोडलं असलं तरी खेळाडू म्हणून मुंबई क्रिकेट असोसिएशन सोबतचा प्रवास सुरु असेल. येत्या हंगामात आणखी ट्रॉफी जिंकण्यासाठी प्रयत्न करु, असं अजिंक्य रहाणे म्हणाला.अजिंक्य रहाणे यानं २०१ प्रथमश्रेणी सामन्यांमध्ये १४००० धावा केल्या आहेत. अजिंक्य रहाणेच्या नेतृत्त्वात मुंबईनं ७ वर्षानंतर रणजीचं विजेतेपद विदर्भ संघाला अंतिम फेरीत पराभूत करुन २०२३-२४ च्या हंगामात मिळवलं. याशिवाय इराणी ट्रॉफीत देखील विजेतेपद मिळवलं. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी २०२२-२३ मध्ये मुंबईच्या संघासाठी अजिंक्य रहाणेची कामगिरी महत्त्वाची ठरली.
शार्दुल ठाकूरचं नाव मुंबईच्या कॅप्टनपदासाठी विचारात घेतलं जाऊ शकतं. दुलीप ट्रॉफीसाठी शार्दुल ठाकूर पश्चिम विभागाचा कॅप्टन आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या निवड समितीचे वरिष्ठ सदस्य अजिंक्य रहाणेचं मत विचारात घेऊ शकतात. शार्दुल ठाकूरनं गेल्या वर्षीच्या हंगामात ५०५ धावा केल्या होत्या, तर ३५ विकेट घेतल्या होत्या. या कामगिरीच्या जोरावर शार्दुल ठाकूरला इंग्लंड विरूद्धच्या मालिकेत टीम इंडियामध्ये स्थान मिळालं होतं.
शार्दुल ठाकूरला गेल्या वर्षीच्या देशांतर्गत क्रिकेटमधील दमदार कामगिरीच्या जोरा-वर भारतीय संघात स्थान मिळवलं होतं. याशिवाय शार्दुल ठाकूरला आयपीएलमध्ये लखनौ सुपर जायंटसकडून खेळण्याची संधी मिळाली होती. मुंबईच्या संघात श्रेयस अय्यर, शिवम दुबे यांच्यासारखे दिग्गज खे-ळाडू असताना शार्दुल ठाकूरचं नाव सध्या

# नगरपरिषद श्री गणेश मंडळाद्वारे विविध कार्यक्रम

**उदगीर/प्रतिनिधी :** उदगीर नगरपरिषद कार्यालया अंतर्गत, सालाबादप्रमाणे अधिकारी व कर्मचारी मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा करत असतात. यावर्षी नगरपरिषद श्री गणेश मंडळामार्फत दिनांक २८ ते ३० ऑगस्ट २०२५ या कालावधीत विविध उपयुक्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे तपशील पुढीलप्रमाणे:

गुरुवार, दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, विषय: स्पर्धा परीक्षांची ओळख, युपीएससी व एमपीएससी तयारीची दिशा, तसेच अंकगणित व बुद्धिमापनाचे महत्त्व.

मार्गदर्शक : कपिल हांडे (क्लस्टर हेड, द युनिक अकॅडमी पुणे), प्रा. धनंजय पाटील व अमोल सोसे.

शुक्रवार, दि. २९ ऑगस्ट २०२५ रोजी लोकव्याख्यान विषय: ''युवकांचे प्रेरणास्थान रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज'' व्याख्याते: प्रा. विशाल गरड, (प्रख्यात लोकव्याख्यानकार व लेखक), बार्शी. तर शनिवार, दि. ३० ऑगस्ट २०२५ रोजी विषय: ''सुजाण पालकत्व – मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांची भूमिका'' मार्गदर्शक: डॉ. विद्या कांदे, (प्राध्यापक व विभाग प्रमुख, बालरोगशास्त्र), एम.आय.एम.एस.आर. मेडिकल कॉलेज, लातूर.

सर्व कार्यक्रम सायं. ४ ते ७ या वेळेत, उदगीर नगरपरिषद कार्यालया समोर आयोजित करण्यात येणार आहेत. नगरपरिषद श्री गणेश मंडळाच्या वतीने सर्व उदगीरकरांना नम्र आवाहन करण्यात येते की आपण आपल्या कुटुंबासह या उपयुक्त कार्यक्रमांना आवर्जून उपस्थित राहून लाभ घ्यावा. नगरपरिषद श्री गणेश मंडळाने यावर्षी स्तुत्य उपक्रम हाती घेतला असून यात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, आपल्या सर्वांचे प्रेरणास्थान असणारे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, तसेच सद्यस्थितीत पालकत्व निभावताना घ्यावयाची खबरदारी या तिन्ही कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजात चांगले प्रबोधन घडेल अशी अपेक्षा आहे. सर्व नागरिकांनी आपला अमूल्य वेळ काढून या कार्यक्रमांना उपस्थित राहावे.

**– सोमनाथ जाधव,**
**मुख्याधिकारी, उदगीर नगरपरिषद**



लातूरचे माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांच्या निवासस्थानी इको फ्रेंडली गणेश मूर्ती स्थापना करण्यात आली, यावेळी सहपरिवार विधिवत गणेशाचे पूजन करीत लातूरकरांना सुख समृद्धी लाभण्याचे साकडे त्यांनी घातले. मागील १० वर्षांपासून गोजमगुंडे परिवार इको फ्रेंडली गणेश मूर्तींची स्थापना करीत आहे.

## मुक्तांगणमध्ये चिमुकल्यांनी केले बाप्पांचे उत्साहात स्वागत





**लातूर/प्रतिनिधी :** लातूरच्या विशालनगर परिसरातील श्री साई मंदिरा समोरील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलीत मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये शैक्षणिक उपक्रमांबरोबरच सांस्कृतीक व राष्ट्रीय उपक्रमांना प्राधान्य देवून चिमुकल्यांना त्यांचे महत्व पटवून देण्याचे काम अविरत पणे केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून सर्वांना प्रेरणा देणारा, उत्साहदायी व आनंदमयी वातावरण निर्माण करणारा गणेशोत्सव अतिशय उत्साहात साजरा करण्यात येत आहे. यावेळी चिमुकल्यांनी अतिशय उत्साहात, गणरायाची प्राणप्रतिष्ठापणा केली.

मुक्तांगणच्या चिमुकल्यांनी ढोल ताशांच्या गजरात, गुलाल व पुष्पांची उधळण करत मोठ्या हर्षोल्हासात गणरायाचे स्वागत केले. यावेळी चिमुकल्यांनी ''गणपती बप्पा मोरया, मंगल मूर्ती मोरया'' च्या जयघोषाने शाळा व परिसरातील वातावरण मंगलमय करुन टाकले होते.

मुक्तांगण बाल गणेश मंडळ या वर्षी १७ व्या वर्षात पदार्पण करत आहे. यावर्षी शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थीनींनी त्यांच्या मंडळांच्या कमिटीतील मेंबरची निवड चिठ्ठी उचलून केली. त्यानुसार या बाल गणेश मंडळाचे अध्यक्ष जीयांश ईश्वर राठोड, आद्या प्रमोद हंगरगे, उपाध्यक्ष शिवांश प्रमोद बिबिनवरे, रेधांश धनराज सोमवंशी, सचिव – आरुषी मुकेश चौधरी, अद्वैत कृष्णा वीर, कोषाध्यक्ष राजवीर रवीकांत माने, व्यवस्थापक गौरवी प्रवीण यादव, आयोजक शिवांश सचिन वांगसकर, गौरवी महेशकुमार मुंदडा, सह आयोजक गौरवी महेश सावंत, शुभ्रा सौरभ मडके, प्रसिद्धी प्रमुख मेधाविनी मिलिंद दवणे, अर्णव नानासाहेब कदम व शाळेतील इतर विद्यार्थ्यांची निवड सदस्य म्हणून करण्यात आली.

शाळेच्या परिसरात गणपती बप्पांचे आगमन झाल्यानंतर गणपतीच्या गाण्यावर ठेका धरला व फुलांच्या वर्षाव व मोठ्या जयघोषाने बाप्पांचे स्वागत अतिशय हर्षोल्हासात व आनंदात केले. यावेळी प्रमुख पाहुणे श्रीकृष्ण लाटे, कविता लाटे, प्राचार्या सुमेरा शेख, मुक्तांगण बाल गणेश मंडळाचे अध्यक्ष जीयांश राठोड, अद्वैत वीर, आरुषी चौधरी, गौरवी सावंत यांच्या हस्ते गणरायाच्या मुर्तीची पूजा व मंगल आरती करण्यात आली.

यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थीनींनी अथर्वशिर्षाचे व मंत्रपुष्पांजलीचे पठण केले. याप्रसंगी पालक बहुसंख्येने उपस्थित होते. यानंतर शाळेतील सर्व विद्यार्थी विद्यार्थीनींनी बाप्पांना अभिवादन करुन सर्व विद्यार्थ्यांनी प्रसाद घेतला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन माधुरी वाघमारे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## सगळीकडे घटस्फोटाची चर्चा असताना मॅनेजरचे शब्द खरे ठरले, गोविंदा अन् सुनीता आहुजा गणेशोत्सवासाठी एकत्र

मुंबई: गेल्या काही दिवसांपासून अभिनेता गोविंदा आणि सुनीत आहुजा यांचा घटस्फोटो होणार असल्याची चर्चा सुरु होती. मात्र, गणेश चतुर्थीच्या विशेष (बुधवारी, दि.२७) प्रसंगी गोविंदा आणि त्यांची पत्नी सुनीता हे दोघेही एकत्र माध्यमांसमोर आले. या वेळी दोघांनी सर्वांना गणेश चतुर्थीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच टीना आणि यश या त्यांच्या मुलांसाठी लोकांकडून आशीर्वादही मागितले. गोविंदाच्या मॅनेजरने काही दिवसांपूर्वी गणेशोत्सवासाठी दोघे एकत्र दिसतील, असे म्हटले होते. त्यामुळे मॅनेजरचे शब्द खरे ठरले आहेत, असे बोलले जाते आहे.

''आपण सारे एकत्र राहू'' – गोविंदा

गणेश चतुर्थीच्या निमित्ताने माध्यमांशी बोलताना गोविंदा म्हणाला, ''यापेक्षा खास असं काहीच असू शकत नाही. जेव्हा बाप्पाचं आशीर्वाद लाभतं तेव्हा कुटुंबातील सगळ्या अडचणी दूर होतात आणि दुःख नष्ट होतं. आम्ही प्रार्थना करतो की आपण सगळे मिळून शांततेत जीवन व्यतीत करावं. आपण सारे असेच एकत्र राहू.''

मुलांसाठी घेतला आशीर्वाद

या खास प्रसंगी गोविंदांनी आपल्या मुलांचा – टीना आणि यशचा उल्लेख केला. ते म्हणाले, ''मी विशेषत: तुमचा आशीर्वाद यश आणि टीनासाठी मागतो. तुम्ही सगळे त्यांना साथ द्या आणि आधार द्या. मी बाप्पाकडे त्यांच्या यशासाठी प्रार्थना करतो. तुमचं प्रेम आणि आशीर्वाद त्यांचं नाव माझ्याहूनही मोठं करो आणि लोक आश्चर्यचकित होतील की गोविंदाची मुलं कुठल्याही बाहेरच्या मदतीशिवाय एवढं मोठं यश मिळवू शकली.''

घटस्फोटाच्या अफवांवर दिला नाही प्रतिसाद

या दरम्यान थेट काही न बोलता, पण जेव्हा त्यांच्या घटस्फोटाच्या अफवांबद्दल विचारण्यात आलं तेव्हा दोघांपैकी कुणीही उत्तर दिलं नाही. मात्र गोविंदा आणि सुनीता यांना कॉन्ट्रोव्हर्सीबाबत विचारलं असता सुनीता म्हणाल्या, ''तुम्ही इथे कॉन्ट्रोव्हर्सी ऐकायला आलात का की 'गणपती बाप्पा मोरया' म्हणायला आलात?''

## दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल




**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील प्राणिशास्त्र व मत्स्यशास्त्र विभागातर्फे दि.२५ ऑगस्ट २०२५ रोजी मांजरा शासकीय मत्स्यबीज उत्पादन केंद्र,धनेगाव येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आलेले होते.या शैक्षणिक सहलीकरीता महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व विभाग प्रमुख डॉ.रवी सोळुंके यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

सदरील सहलीसाठी सहल समन्वयक डॉ.सुरज कोल्हे,डॉ.अमोल ठोसर, प्रा.मनाली आगलावे व सुजित अपसिंगेकर यांनी उत्तमरित्या नियोजन केलेले होते.या सहलीकरीता बी.एस्सी. पदवीच्या एकूण ५४ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविलेला होता.या सहलीचा मुख्य उद्देश असा होता की,भारतीय प्रमुख कार्प म्हणजे कटला,रोहू,मृगल या मास्यांचे मत्स्यबीज उत्पादन निर्मिती,संगोपन,संचयन,खाद्य व्यवस्थापन,रोग नियंत्रण आणि काढणी इत्यादी दाखविणे व ते समजून घेणे हा होता.दयानंद विज्ञानच्या विद्यार्थ्यांनी मत्स्यबीज उत्पादन केंद्राचे बारकाईने सूक्ष्म निरीक्षण व संशोधनात्मक अभ्यासही केला.

## लातूर जिल्ह्यात आयुष्मान कार्ड व आयुष्मान वय वंदना कार्ड निर्मिती विशेष मोहीम

**लातूर/प्रतिनिधी :** आयुष्मान भारत– प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत लातूर जिल्ह्यातील सर्व नागरिकांना प्रति कुटुंब प्रति वर्ष ५ लाख रुपयांचा मोफत उपचार १३५६ आजारांवर जिल्ह्यातील ५८ अंगीकृत रुग्णालयांमध्ये उपलब्ध आहे. तसेच, आयुष्मान वय वंदना योजनेअंतर्गत ७० वर्षे आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना अतिरिक्त ५ लाख रुपयांचा मोफत उपचार मिळणार आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी आयुष्मान कार्ड आणि आयुष्मान वय वंदना कार्ड अत्यावश्यक आहे. यासाठी १६ ऑगस्ट २०२५ ते ७ सप्टेंबर २०२५ या कालावधीत विशेष मोहीम राबवली जात आहे.

जिल्ह्यात आतापर्यंत ७.७७ लाख आयुष्मान कार्ड तयार झाले असून, उर्वरित नागरिकांनी त्वरित आपले कार्ड तयार करून घ्यावे. हे कार्ड बनविण्यासाठी अद्यावत शिधापत्रिका, आधार कार्ड आणि आधार क्रमांकाला जोडलेला मोबाईल क्रमांक, ज्येष्ठ नागरिकांचे आयुष्मान वय वंदना कार्ड तयार करण्यासाठी आधार कार्ड आणि आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक आवश्यक आहे.

नागरिक स्वतः गुगल प्ले स्टोअरवरून आयुष्मान ॲप डाऊनलोड करून बेनिफिशियरी लॉगिनद्वारे कार्ड तयार करू शकतात. तसेच, आशा सेविका, सीएससी सेंटर, आपले सरकार सेवा केंद्र, ग्रामपंचायत ऑपरेटर, स्वस्त धान्य दुकान किंवा रुग्णालयातील आरोग्य मित्र यांच्याशी संपर्क साधून कार्ड बनविता येईल. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होऊन आयुष्मान कार्ड तयार करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर– घुगे, , जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना आणि लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांनी केले आहे.

## किसान बँक स्टॉप गणेश मंडळ द्वारा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्यालयात श्रींची स्थापना



**लातूर/प्रतिनिधी :** गणपती बाप्पा मोरया मंगल मूर्ती मोरया या जयघोषात गणरायाचे आगमन झाले लातूरच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्यालयात किसान बँक स्टॉप गणेश मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्रींची स्थापना करण्यात आली यावेळी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव सौ रेखाताई प्रमोद जाधव यांच्या हस्ते सपत्निक पूजा करण्यात आली त्यानंतर प्रसाद वितरण करण्यात आला. बँकेच्या मुख्यालयात गणरायाचे आगमन झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात गणेश भक्तांनी स्वागत केले

यावेळी जिल्हा बँकेचे कार्यकारी संचालक हणमंतराव जाधव किसान बँक स्टॉप गणेश मंडळांचे कार्यकारी अध्यक्ष अमोल सुर्यवंशी मंडळाचे उपाध्यक्ष ओ.बी जळकोटे सचिव सचिन उटगे सहसचिव प्रशांत कंजीकर,कोषाध्यक्ष सुनील पाटील, बँकेचे व्यवस्थापक जे के येरटे,व्यवस्थापक बि एस मलवाडे, श्री हरिदास,श्री कोळपे, श्री भाटकर, श्री खानापुरे श्री माने, श्री लक्ष्मण देशमुख कमलाकर जाधव, श्री बुड्डे, वैभव काकडे, सौ जागृति जाधव, हरिराम कुलकर्णी उपस्थित होते

## औसा तालुक्यातून मराठा समाज बांधव मराठा आरक्षणासाठी मुंबईकडे रवाना

**औसा/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आता तालुकास्तरावरूनही मोठ्या प्रमाणावर जनआंदोलनाला चालना मिळत आहे. औसा तालुक्यातील शेकडो मराठा समाज बांधव, युवक व महिला आज सकाळी साडेनऊ वाजता आरक्षणाच्या ठाम मागणीसाठी मुंबईकडे रवाना झाले.

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी समाजबांधवांनी संघटित स्वरूपात एकत्र येत आपली भूमिका ठामपणे मांडण्याचा निर्धार केला आहे. औसा शहरासह ग्रामीण भागातून अनेक गाड्यांतून समाज बांधव निघाले असून, ''आरक्षण हा आमचा हक्क आहे, कुणाच्या ताकदीवर मिळालेला नाही,'' असा निर्धार त्यांच्या घोषणांतून उमटत होता.

समाजाच्या मागण्या न्याय्य असून, महाराष्ट्र सरकारने तातडीने सकारात्मक पावले उचलावीत, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली. मराठा समाजाच्या हक्कासाठी ही लढाई शेवटपर्यंत लढू, असा ठाम निर्धार यावेळी सर्वांनी दाखवून दिला.

## विविध प्रश्नांची तत्काळ सोडवणूक करा..

### कास्ट्राईब महासंघाची गटविकास अधिकाऱ्यांकडे मागणी..

**निलंगा/आयुब बागवान :** विविध विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांची तात्काळ सोडवणूक करण्यात यावी या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाची बैठक संपन्न झाली. पंचायत समिती निलंगा येथील सभागृहात गटविकास अधिकारी सोपान अकेले यांनी त्यांच्या सर्व खाते प्रमुख व कास्ट्राईबचे जिल्हाध्यक्ष नागसेन कांबळे व इतर पदाधिकाऱ्यांसमवेत बैठक संपन्न झाली.

यात जिल्हाध्यक्ष नागसेन कांबळे यांनी अनेक प्रलंबित प्रश्नासंदर्भात गट विकास अधिकाऱ्यांचे खालील प्रश्नांसंदर्भात लक्ष वेधले त्यात प्रामुख्याने शिक्षण विभागातून निवड श्रेणी प्रस्ताव गहाळ होणे, मेडिकल बिलअदा करण्यासाठी अर्थपूर्ण व्यवहार करणे, गोपनीय अहवालाची प्रत देणे, दुय्यम सेवा पुस्तिका अद्ययावात करणे, आय.सी.डीएस. कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत काढणे, सातव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चितीची पडताळणी करणे, शिक्षक पुरस्कार निवड व वितरण करणे, अंगणवाडी कार्यकर्त्या व मदतनीस यांचे कपात केलेली वेतन अदा करणे, ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल तीन वर्षापासून प्रलंबित आहेत ते तात्काळ देणे. शासनाच्या विविध योजनांचे ग्रामपंचायतींना पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करणे, इत्यादी अनेक प्रश्नाची सोडवणूक करण्याची मागणी करण्यात आली.



या मागण्यांना गटविकास अधिकारी सोपान अकेले यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. चर्चेअंती अर्ध्या प्रश्नांची बैठकीतच सोडवणूक केली.उर्वरित सर्वच प्रश्न येत्या आठ दिवसांमध्ये मार्गी लावले जातील असे गटविकास अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले.

या बैठकीस गटविकास अधिकारी सोपान अकेले, पशुसंवर्धन विकास तालुका आरोग्य अधिकारी,यांच्यासह अनेक विभागप्रमुख व महासंघाचे विभागीय अध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी, जिल्हाध्यक्ष नागसेन कांबळे,उपाध्यक्ष डि के सूर्यवंशी, निलंगा तालुका अध्यक्ष दीपक कांबळे,सचिव भिवाजी लखनगावे ,सहसचिव आनंद सूर्यवंशी,पत्रकार किशोर सोनकांबळे, प्रशासन अधिकारी बालाजी मोहोळकर, यमलवाड, मलशेट्टे यांच्यासह विविध खात्याचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी निलंगा तालुक्यामध्ये विक्रमी वृक्ष लागवड केल्यामुळे कास्ट्राइब कर्मचारी कल्याण महासंघातर्फे गट विकास अधिकाऱ्यांचा '' वृक्षमित्र'' म्हणून सत्कार करण्यात आला.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# ‘केशवराज’मध्ये ढोल ताशांच्या गजरात श्रींची प्रतिष्ठापना

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. २७ ऑगस्ट २०२५ बुधवार रोजी ढोल ताशांच्या गजरात श्रींची प्रतिष्ठापना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शहर संघ चालक उमाकांत मद्रेवार व सौ मद्रेवार तसेच विद्यार्थी गणेश मंडळ अध्यक्ष अमरदीप हुडे, उपाध्यक्ष श्रेयशी एरंडे (८ ते१० वी विभाग), पाचवी ते सातवी विभागातील विद्यार्थी गणेश मंडळ अध्यक्ष सृष्टी माडे, उपाध्यक्ष संध्या पटाडे यांच्या हस्ते करण्यात आली. तत्पूर्वी विद्यालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या दांडिया, लेझीम नृत्य, ढोल ताशांच्या गजरात श्री गणेशाचे आगमन विद्यालयात झाले.



त्यानंतर पर्यावरणपूरक श्री गणेशाच्या मूर्तीची विधिवत पूजा करून मान्यवरांच्या हस्ते आरती करण्यात आली.

याप्रसंगी केशवराज शैक्षणिक संकुल, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शिक्षक-पालक संघाच्या अध्यक्षा दुर्गा गोविंदपूरकर, उपाध्यक्षा शैलजा हसबे, पालक अभिजीत हुडे, जगदीश पंडित, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, विद्यासभा संयोजक तथा उपमुख्यध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी, विद्यार्थी गणेश मंडळातील सर्व सदस्य, पाचवी ते दहावी विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, सहप्रमुख मीरा चामवाड, गणेशोत्सव प्रमुख वैशाली फुलसे, सहप्रमुख दिपाली मुचाटे, विद्यार्थी गणेश मंडळातील अध्यक्ष उपाध्यक्ष व सर्व सदस्य तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# राजमाता जिजामाता संकुलात ‘विघ्नहर्त्या’ची प्रतिष्ठापना




**लातूर/प्रतिनिधी :** येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेज, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यालयात बुधवारी ‘गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया’चा गजर करत संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते विधिवत पूजन करून विघ्नहर्त्या गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली.

प्रारंभी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये व प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांच्या हस्ते बाप्पांची आरती करण्यात आली. यावेळी उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, करिष्मा केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे, पर्यवेक्षिका सुनीता जवळे, मदन धुमाळ, आर. पी. मुंडे, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### पार्थ पवार अन् जॅकलिनचा ‘लालबागचा राजा’च्या मंडपातील तो व्हिडीओ चर्चेत

**मुंबई/प्रतिनिधी :** गणेशोत्सवाला मोठ्या धुमधडक्यात सुरुवात झाली आहे. मुंबईमधील अनेक मोठ्या गणपती मंडपांमध्ये भाविकांच्या लांबच लांब रांगा पहिल्या दिवसापासून पाहायला मिळत आहेत. गणेश चतुर्थीच्या दिवशी पहाटे पाच वाजताच मुंबईतील प्रसिद्ध ’लालबागचा राजा’ गणपतीची प्राणप्रतिष्ठापणा झाली. त्यानंतर दर्शनाची रांग सुरु करण्यात आली असून पहिल्याच दिवशी अनेक मान्यवरांनी ’लालबागचा राजा’चं दर्शन घेतलं. मात्र यापैकी अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसने दर्शन घेताना केलेली एक कृती सध्य चांगलीच चर्चेत असल्याचं दिसत आहे. लालबागचा राजाचं हे ९२ वं वर्ष असून लालबागच्या राजाचा दरबार तिरुपती बालाजीच्या राज मुकुटात सजवण्यात आला आहे. यंदा लालबागचा राजासाठी खास ’सुवर्ण गजानन महल’ तयार करण्यात आला आहे. पहिल्याच दिवशी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंबरोबरच त्यांची पत्नी रश्मी ठाकरे आणि आमदार पुत्र आदित्य ठाकरेंनीही लालबागचा राजाचं दर्शन घेतलं.

# दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या बीबीए विभागातर्फे औद्योगिक सहल

## विद्यार्थ्यांनी जाणून घेतली कार्याची प्रत्यक्ष माहिती

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या बीबीए विभागाच्या वतीने धाराशिव जिल्ह्यातील घारगाव येथील नॅचरल शुगर्स अँड अलाइड इंडस्ट्री येथे विद्यार्थ्यांची औद्योगिक सहल काढण्यात आली होती. यात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कामकाजाचे अनुभव घेतले.

दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, बीबीए समन्वयिका डॉ. वैशाली सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली १९ ऑगस्ट रोजी ही औद्योगिक सहल काढण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी नॅचरल शुगर्स अँड अलाईड इंडस्ट्री येथील प्रक्रिया उद्योगांना भेटी देऊन तेथील कामांची माहिती जाणून घेतली. दुधापासून तयार होणारे विविध पदार्थ त्यावर प्रक्रिया कशी केली जाते याची माहिती घेतली. यावेळी प्रा. प्रेमसागर मुंदडा, प्रा. स्नेहल पाटील, प्रा. नम्रता वाघमारे, प्रा. क्षितिज कांबळे उपस्थित होते.





### टी.सी. हरवली आहे

शेख तरन्नूम महेबुबा या नावाची हकानिया उर्दु हायस्कुल चाकूरची ९ वी पासची टीसी. लातूरच्या पाच नंबर चौक ते १२ नं पाटी दरम्यान ॲटो प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास कळवावे योग्य बक्षिस दिले जाईल.

-संपर्क:९३०७५६९४७३


# पानगावात रस्ता नसल्याने दुसऱ्या स्मशानभूमीमध्ये केला अंत्यविधी

## लिंगायत समाजातून प्रशासनाच्या विरोधात तीव्र संताप

**रेणापूर/प्रतिनिधी :** माणसाने शेवटचा श्वास घेतल्यानंतर त्याच्या अंत्यसंस्कासाठी त्याची अंत्ययात्रा काढली जाते. तेव्हा प्रत्येक ठिकाणी गावकुसाबाहेर असलेल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जातात.

परंतू आजही पानगाव या ठिकाणी पंचकुंड महादेव मंदिर जवळ असलेल्या ५ समाजासाठी एकत्रित असलेल्या स्मशानभूमीला जाण्यासाठी नसल्यामुळे बुधवारी एक अंत्यविधी दुसऱ्याच स्मशानभूमीत करण्यात आली. यावेळी लिंगायत समाजातून प्रशासनाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

रेणापूर तालुक्यातील पानगाव हे जवळपास २० ते २५ हजार लोकसंख्या असलेले मोठ्या बाजार पेठेचे ठिकाण असून या ठिकाणी पंचकुंड महादेव मंदिर लगत लिंगायत, मराठा, माळी, न्हावी, जंगम या पाच समाजाची स्मशानभूमींची गेल्या १०० वर्षापासून जागा गट नंबर १० मध्ये जवळपास ९ गुंठे जमीन असून या स्मशानभुमीला जाण्यासाठी अद्याप रस्ता नाही.

रस्त्या अभावी ही स्मशानभूमी समस्येच्या विळख्यात सापडली असून या स्मशानभूमीच्या रस्त्याकडे गेल्या अनेक वर्षांपासून शासनदरबारी लेखी व तोंडी अनेकवेळा स्मशानभूमी असलेल्या पाच ही समाजाकडून पाठपुरावा सुरुच आहे. तीन वेळेस मोजणीसाठी फिस ही भरण्यात आली असतानाही प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचे सांगितले जाते आहे. या स्मशानभूमीकडे पावसाळ्यात जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे आजूबाजूला पिके असतात. या पिकातून वाट काढत अंत्ययात्रा घेऊन जाण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे आणि पावसाळ्यात तर पिकातून आणि चिखलातून वाट काढावी लागते. या स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता मिळावा.

> स्मशाभूमीला रस्ता उपलब्ध करून द्यावा पानगाव येथील पाच समाजाची एकत्रित असलेल्या पंचकुंड महादेव मंदिर जवळील स्मशानभूमींची जागा मोजणी करण्यासाठी तहसील कार्यालयाकडे महात्मा बसवेश्वर संस्थानच्या वतीने चलन भरण्यात आले आहे. भूमी अभिलेख कार्यालयाला लवकरच पत्र काढून या जागेची मोजणी करून या स्मशाभूमीला रस्ता उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
>
> **–तानाजी यादव,**
> **नायब तहसीलदार**

### मिच्छामि दुक्कडम्

चुकून मुद्दाम चुकलं
मागावी जरूर क्षमा
पाप क्षालन घडता
पुण्य खात्यात जमा

मनातून मागा क्षमा
राम राम ना जुलमा
आतून हवी भावना
नसो खोटा मुलामा

ताकद क्षमेत मोठ्ठी
सहज हरवे अधमा
गुण हा अमोल असे
दागिना मिळे उत्तमा

सीता लाभली रामा
नारायणा शोभे रमा
शूराचीअर्धांगी क्षमा
शंकराची जणू उमा

अहिंसेचे अस्त्र क्षमा
स्वभावा दिसे सुषमा
षड्रिपुने त्रस्त व्याधि
थंडावे सगळा उष्मा

क्षमा हे प्रेमाचे वस्त्र
प्रगल्भ करे आत्मा
क्षमा करण्या नम्रता
प्रसन्नचित्त परमात्मा

शब्दोच्चार क्षमापना
जणू विश्व परिक्रमा
क्षमा मागणे न् करणे
भूषण शोभे विक्रमा

**हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# विद्यावर्धिनी शाळेत पर्यावरणपूरक गणपती कार्यशाळा

## पीओपीच्या मूर्तीने जलप्रदूषण टाळण्यासाठी विद्यावर्धिनी व रोटरीचा अभिनव उपक्रम

**अहमदपूर/प्रतिनिधी :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणाची काळजी घेण्याचं महत्त्व शालेय विद्यार्थ्यांना समजण्यासाठी अहमदपूर येथील विद्यावर्धिनी हायस्कूलने रोटरी क्लबसोबत एक स्तुत्य उपक्रम राबवला. शाळेने नुकतीच पर्यावरणपूरक गणपती बनवण्याची कार्यशाळा आयोजित केली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिवाजी पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून रोटरीचे सचिव धीरज ढेले व शाळेच्या मुख्याध्यापक सुषमा पाटील, गोपाल पटेल हे होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

या कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून किंवा इतर नैसर्गिक पदार्थांपासून मूर्ती बनवायला शिकवणे हा होता. बाजारात मिळणाऱ्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण टाळण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरला. विद्यार्थ्यांनी मूर्ती बनवण्याच्या पद्धतीचे



प्रशिक्षण घेतले आणि स्वतःच्या हातांनी आकर्षक मूर्ती तयार केल्या.

या कार्यशाळेची सुरुवात विद्यार्थ्यांना पर्यावरणाचा महत्त्व समजावून सांगण्यापासून झाली. शिक्षकांनी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींचे दुष्परिणाम, जसे की पाण्यातील जीवनावर होणारा नकारात्मक परिणाम आणि पाण्याच प्रदूषण, याबद्दल माहिती दिली. यानंतर, शाडू माती आणि नैसर्गिक रंगांचा वापर करून मूर्ती कशा बनवायच्या, याचं प्रात्यक्षिक दाखवण्यात आले आहे. या कार्यशाळेत मूर्ती बनवण्यासाठी फक्त नैसर्गिक आणि पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर करण्यात आला. यात शाडू माती, नैसर्गिक रंग (हळद, कुंकू, गेरू), आणि इतर बायोडिग्रेडेबल (नैसर्गिकरित्या विघटन होणारे) पदार्थांचा समावेश होता.

अहमदपुरात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची सुरुवात या कार्यशाळेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसाठी हा एक अनोखा अनुभव होता. शाळेतील विद्यार्थ्याने सांगितलं, आम्ही दरवर्षी बाजारातून गणपती आणतो, पण यंदा आम्ही स्वतः मूर्ती बनवली. ही मूर्ती पर्यावरणासाठी चांगली आहे याचा आनंद आहे. विद्यावर्धिनी हायस्कूलच्या या उपक्रमाचा सर्वत्र कौतुक होत आहे. अशा कार्य शाळांमधून विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच पर्यावरणाची जाणीव निर्माण होते आणि ते भविष्यातही अशाच चांगल्या गोष्टी आत्मसात करतात, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या उपक्रमामुळे अहमदपूरमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची सुरुवात झाली आहे.


**महाराष्ट्र शासन**
**सा.बां. (विद्युत) विभाग, धाराशिव**
**ई-निविदा सुचना क्र.(९)सन-२०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, धाराशिव (दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२९९४३१) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे मागवित आहेत. उपरोक्त निविदामध्ये सात कामे समाविष्ठ असून या निविदे अंतर्गत संपुर्ण माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१. उपरोक्त एकत्रीत कामाची निविदा किंमत रुपये १.०० कोटी पेक्षा अधिक आहेत. दहा लाखाच्या आतील किंमतीचे ०२ कामे व १० लाखाच्या वरील किंमतीचे ०५ कामे आहेत.

२. या निविदेसंबंधी संपुर्ण माहिती खालील दिलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच यापुढील सर्व बदलाची माहिती याच संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

http://mahatenders.gov.in
www. mahapwd.gov.in

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां.विद्युत विभाग, धाराशिव**

क्रमांक:**आरओसी**-२०२५-२६/क्र.-५/सी२२७५


### मनातील व्यथा मांडणार माझं इवलं अक्षर:चला कवितेच्या बनात अंतर्गत साहित्यकृतीवर संवाद कार्यक्रमात राजेसाहेब कदम यांचे प्रतिपादन

**लातूर/प्रतिनिधी :** भूतकाळ म्हणजे छळून छळून बेपत्ता झालेला दगाबाज, भविष्यकाळ म्हणजे अत्यंत बेभरवशाचा इसम आणि वर्तमान काळ म्हणजे सतत झुलवत ठेवणारा गारुडी, आणि या सर्वांचा आवडता माणूस. या सर्वांमुळे मनाला झालेल्या वेदनेने जनात जगताना होणाऱ्या व्यथा मांडणारा कवितासंग्रह म्हणजे माझं इवलं अक्षर होय. असे मत प्रसिद्ध कवी राजेसाहेब कदम यांनी व्यक्त केले.

चला कवितेच्या बनात अंतर्गत गेल्या १४ वर्षांपासून अखंडितपणे चालू असलेल्या वाचक संवादाचे ३४३ वे पुष्प गटशिक्षणाधिकारी बालाजी बिरादार यांचे अध्यक्षतेखालील संजय चौधरी लिखित माझं इवलं अक्षर या साहित्यकृतीवर संवाद साधताना प्रसिद्ध कवी राजेसाहेब कदम म्हणाले की, संजय चौधरी हे ऐकणाऱ्याच्या मनात प्रश्न निर्माण करणारा मात्र हृदयी कवी आहे. अर्थात परकाया प्रवेश करणारा अत्यंत उत्कृष्ट कवी आहे.


**टोनर रिफिलिंग**



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६